सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन

# सेतू-अभ्यास

## Bridge-Course

# सहावी- मराठी

## शैक्षणिक वर्ष २०२१-२२

**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

ज्ञानसेवा तु साफल्यम्



# सेतू अभ्यास ( ब्रिज कोर्स ) : इयत्ता सहावी


- प्रवर्तक : शालेय शिक्षण विभाग ,महाराष्ट्र शासन
- प्रकाशक : राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
- प्रेरणा : **मा.वंदना कृष्णा** , (भा.प्र.से )
  अपर मुख्य सचिव , शालेय शिक्षण व क्रीडा विभाग ,मंत्रालय ,मुंबई.
- मार्गदर्शक : **मा.विशाल सोळंकी**, (भा.प्र.से )
  आयुक्त ,(शिक्षण)महाराष्ट्र राज्य ,पुणे.
  **मा. राहुल द्विवेदी**, ( भा.प्र.से )
  राज्य प्रकल्प संचालक ,महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद ,मुंबई.
- संपादक : **मा . दिनकर टेमकर**
  संचालक ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
- सहसंपादक : **डॉ. विलास पाटील**
  सहसंचालक ,राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र,पुणे.
- कार्यकारी संपादक : **डॉ . कमलादेवी आवटे,** उपसंचालक (भाषा व समता विभाग )
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
  **नीता जाधव ,**उपविभागप्रमुख तथा अधिव्याख्याता**,** मराठी विभाग
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
- संपादन सहाय्य : **डॉ.नंदा भोर , अश्विनी नरवणे,** विषय सहायक ,मराठी विभाग,
  राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,महाराष्ट्र ,पुणे.
- निर्मिती सदस्य : **१) नारायण मुदगलवाड** , अधिव्याख्याता (गट समन्वयक )
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, उस्मानाबाद
  **२) माधुरी राऊत**, पदवीधर शिक्षक ,
  जि.प.शाळा नवघर , जिल्हा पालघर
  **३) सीमा महाडिक** ,पदवीधर शिक्षक ,
  जि.प.प्राथ.शाळा, चिरमोडी,तालुका- वेल्हे , जि . पुणे .
  **४) शीतल बोधले ,** विषय सहायक ,
  जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था, अंबाजोगाई.

# मराठी सेतू अभ्यास इयत्ता ६ वी सन २०२१ – २०२२

| क्रमांक | दिवस | क्षेत्र | घटक / उपघटक | पान नं. |
|---|---|---|---|---|
| १ | पहिला | श्रवण / भाषण | कविता गायन | ७ |
| २ | दुसरा | वाचन | चित्रकथा वाचन | ९ |
| ३ | तिसरा | वाचन | चित्रकथा वाचन | ९ |
| ४ | चौथा | लेखन | चित्रवर्णन | १२ |
| ५ | पाचवा | भाषा अभ्यास | नाम | १४ |
| ६ | सहावा | वाचन | संवाद वाचन | १६ |
| ७ | सातवा | लेखन | संवाद लेखन | १८ |
| ८ | आठवा | लेखन | संवाद लेखन | १८ |
| ९ | नववा | भाषा अभ्यास | सर्वनाम | २० |
| १० | दहावा | भाषण | मुलाखत | २२ |
| ११ | अकरावा | लेखन | चित्रावर प्रश्न तयार करणे | २४ |
| १२ | बारावा | लेखन | चित्रावर प्रश्न तयार करणे | २४ |
| १३ | तेरावा | भाषा अभ्यास | सामान्यरूप | २६ |
| १४ | चौदावा | वाचन | सूचना फलक | २८ |
| १५ | पंधरावा | | चाचणी – गुण १५ | ३० |
| १६ | सोळावा | लेखन | सूचना फलक | ३२ |
| १७ | सतरावा | भाषा अभ्यास | संयोगचिन्ह | ३४ |
| १८ | अठरावा | वाचन | बातमी वाचन | ३६ |
| १९ | एकोणिसावा | लेखन | जाहिरात लेखन | ३८ |
| २० | विसावा | भाषा अभ्यास | विशेषण | ४० |
| २१ | एकविसावा | वाचन | प्रकट वाचन | ४३ |
| २२ | बाविसावा | लेखन | घटनाक्रम | ४६ |
| २३ | तेविसावा | भाषा अभ्यास | क्रियापद | ४८ |
| २४ | चोविसावा | वाचन | कवितेचे आकलन | ५० |
| २५ | पंचविसावा | लेखन | अनुभव कथन | ५३ |
| २६ | सव्विसावा | लेखन | अनुभव कथन | ५३ |
| २७ | सत्ताविसावा | भाषा अभ्यास | काळ | ५५ |
| २८ | अठ्ठाविसावा | वाचन | माझा शब्दसंग्रह | ५७ |
| २९ | एकोणतिसावा | भाषा अभ्यास | विरामचिन्हे | ५९ |
| ३० | तिसावा | | चाचणी – गुण १५ | ६१ |
| ३१ | एकतिसावा | लेखन | पत्र लेखन | ६३ |
| ३२ | बत्तीसावा | भाषण | नाट्यीकरण | ६५ |
| ३३ | तेहतीसावा | भाषण | नाट्यीकरण | ६५ |
| ३४ | चौतीसावा | लेखन | चित्रावरून गोष्ट लेखन | ६८ |
| ३५ | पस्तीसावा | लेखन | चित्रावरून गोष्ट लेखन | ६८ |
| ३६ | छत्तीसावा | वाचन | मूकवाचन | ७० |
| ३७ | सदोतीसावा | लेखन | घटनेचे वर्णन करणे | ७३ |
| ३८ | अडतीसावा | लेखन | घटनेचे वर्णन करणे | ७३ |
| ३९ | एकोणचाळीसावा | वाचन | समजपूर्वक वाचन | ७५ |
| ४० | चाळीसावा | वाचन | समजपूर्वक वाचन | ७५ |
| ४१ | एकेचाळीसावा | लेखन | कल्पना करुन लिहा | ७८ |
| ४२ | बेचाळीसावा | लेखन | अनुलेखन , श्रुतलेखन | ८० |
| ४३ | त्रेचाळीसावा | लेखन | उपक्रमाचे वर्णन | ८२ |
| ४४ | चव्वेचाळीसावा | लेखन | घोषवाक्य लेखन | ८४ |
| ४५ | पंचेचाळीसावा | | चाचणी – गुण ३० | ८६ |

# विद्यार्थ्यांशी हितगुज

विद्यार्थी मित्रांनो, मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही ऑनलाइन व इतर विविध मार्गाने तुमचं शिक्षण सुरू ठेवलंत. **या शैक्षणिक वर्षाच्या सुरुवातीला काही दिवस मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमाची उजळणी व्हावी आणि या वर्षीच्या इयत्तेच्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हे उद्दिष्ट ठेवून तुमच्यासाठी हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

मागील शैक्षणिक वर्षात तुम्ही नेमके काय शिकला हे समजण्यासाठी आणि पुढील इयत्तेचा पाठ्यक्रम समजून घेण्यासाठी हा सेतू अभ्यास तुम्हाला मदत करणार आहे. हा सेतू अभ्यास दिवसनिहाय क्रमाने सोडवावा. यात दिवसनिहाय तयार केलेल्या कृतींचा समावेश आहे. तुम्ही दिलेल्या नियोजनाप्रमाणे कृती स्वप्रयत्नाने सोडवाव्यात. कृती सोडवताना अडचण आल्यास शिक्षक किंवा पालकांची मदत घ्या. सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून यामध्ये १५ व्या दिवशी पहिली ३० व्या दिवशी दुसरी व ४५ व्या दिवशी तिसरी याप्रमाणे तीन चाचण्यांचा समावेश आहे. दिलेल्या नियोजनानुसार येणाऱ्या चाचण्या सोडवा. चाचणी सोडवून झाल्यावर शिक्षकांकडून तपासून घ्या. चला सराव करू या व सक्षम बनू या यामधील कृती मध्ये अडचण आल्यास, न समजलेला किंवा अवघड वाटणारा भाग समजून घेण्यासाठी शिक्षकांची किंवा पालकांची मदत घ्या.

**हा सेतू अभ्यास यशस्वीरीत्या पूर्ण करण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा !**

## शिक्षक / पालकांसाठी सूचना

कोविड १९ च्या उद्भवलेल्या परिस्थितीमुळे मागील शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष विद्यार्थी समोर असताना वर्ग अध्यापन होऊ शकले नाही. नव्या शैक्षणिक वर्षात प्रत्यक्ष शाळा कधी सुरू होतील याबाबत अनिश्चितता आहे. मागील शैक्षणिक वर्षात आपण ऑनलाइन माध्यमातून सर्व विद्यार्थ्यांपर्यंत शिक्षण पोहोचवण्यासाठी विविध प्रयत्न केलेत. **मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व्हावी तसेच नवीन शैक्षणिक वर्षात शिकाव्या लागणाऱ्या अभ्यासक्रमाची पूर्वतयारी हा दुहेरी उद्देश ठेवून हा सेतू अभ्यास तयार करण्यात आला आहे.**

- सेतू अभ्यास हा मागील इयत्तेच्या पाठ्यक्रमावर आधारित असून मागील इयत्तेचा पाठ्यक्रम व सध्याच्या इयत्तेचा पाठ्यक्रम यांना जोडणारा दुवा आहे.
- सदर अभ्यास हा इयत्तानिहाय व विषयनिहाय तयार करण्यात आला असून तो मागील इयत्तेच्या पाठ्यपुस्तकाशी संलग्न व त्यातील घटकांवर आधारित आहे.
- सदर अभ्यासात क्षेत्र, कौशल्य, संकल्पना व अध्ययन निष्पत्ती / क्षमता विधाने यांचा समावेश केला आहे. विद्यार्थ्यांना नेमके काय मार्गदर्शन करायचे आहे यासाठी मदत होईल.
- संबंधित संकल्पनेबाबत विद्यार्थ्याचे पूर्वज्ञान जाणून घेण्यासाठी **'जाणून घेऊ या'**, त्या संकल्पनेबाबत त्याने अधिक सक्षम व्हावे यासाठी **'सक्षम बनू या',** मिळालेल्या माहितीचे किती आकलन झाले यासाठी **'सराव करू या'** व मिळालेल्या माहितीच्या आधारे विद्यार्थ्याने आधी चिकित्सक विचार करावा, सर्जनशील व्हावे, अर्थात उच्च बोधात्मक क्षमतांच्या विकासासाठी **'कल्पक होऊ या'** या सदरांचा समावेश केला आहे.
- संकल्पना अधिक चांगल्या रीतीने समजून घेण्यासाठी मदत हवी म्हणून सर्वच कृतीमध्ये दीक्षा ॲप, क्यु आर कोड इ. ची मदत घ्यावी.

- मागील शैक्षणिक वर्षात विद्यार्थी नेमके काय शिकले हे समजण्यासाठी, त्याची चाचपणी करण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना पुढील इयत्तेतील संकल्पना समजून घेण्यासाठी व अध्ययनासाठी हा सेतू अभ्यास अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे.
- सेतू अभ्यास एकूण ४५ दिवसांचा असून त्यात ठराविक कालावधी नंतर घ्यावयाच्या एकूण तीन चाचण्यांचा समावेश आहे.
- शिक्षकांनी प्रत्येक विद्यार्थ्यांकडून सदरचा सेतू अभ्यास दिवसनिहाय नियोजनाप्रमाणे पूर्ण करून घ्यावा.
- चला सराव करू या हे सदर विद्यार्थ्यांनी स्वप्रयत्नाने सोडवावे याकडे शिक्षकांनी लक्ष द्यावे, आवश्यक तेथे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- निश्चित केलेल्या कालावधीनंतर घ्यावयाच्या चाचण्या विद्यार्थ्यांकडून सोडवून घ्याव्यात, चाचण्या तपासून विद्यार्थीनिहाय गुणांची नोंद स्वतःकडे ठेवावी.
- चाचणी तपासताना विद्यार्थीनिहाय विश्लेषण करून मागे पडलेल्या विद्यार्थ्यांना अतिरिक्त पूरक मदत करावी.
- सदरील सेतू अभ्यास हा शिक्षकांसाठी असला तरीही शाळा ऑफलाइन सुरू नसल्याकारणाने याचा वापर करून पालक, शिक्षक मित्र यांच्या मदतीने विद्यार्थ्यांनी केलेल्या अध्ययनाची उजळणी व पुढील इयत्तेत शिकावयाच्या कृतींची किंवा अभ्यासक्रमाची पूर्वतयारी घेऊ शकतील.
- या सेतू अभ्यासात दिलेल्या अध्ययन कृती या मार्गदर्शक असून शिक्षक आपल्या वर्गाच्या व विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार विद्यार्थ्यांच्या अध्ययन संदर्भात इतर आवश्यक त्या कृती घेऊ शकतात.

**सेतू अभ्यासच्या अंमलबजावणी व वापराकरिता आपणास हार्दिक शुभेच्छा!**

पहिला दिवस

क्षेत्र – मौखिक भाषा

कौशल्ये / क्षमता :- श्रवण, भाषण

संबोध :- कविता, गाणी

**अध्ययन निष्पत्ती :- ५.०१.०१ ऐकलेल्या ,वाचलेल्या साहित्यातील ( विनोदी, साहसी, कविता इ.) विषयांवरील विषय,घटना,चित्रं,पात्रं व शीर्षक यांबाबत चर्चा करतात.**

**६.०१.१८ पाठ्यविषय ( पाठ, कविता, विनोद,गाणी इ.) लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेतात.त्यांच्या ध्वनिफिती समजपूर्वक ऐकतात.**

**६.०१.१९ कविता,गाणी अभिनयासह व योग्य आरोह-अवरोहासह आनंददायी पद्धतीने म्हणतात.**

## जाणून घेऊ या

- **शिक्षकांनी 'वल्हवा रं वल्हवा ' हे गाणे तालासुरात,साभिनय म्हणून दाखवावे.**
- **विद्यार्थ्यांनी गाणे लक्षपूर्वक ऐकावे.**



ऐका व म्हणा.

वल्हवा रं, वल्हवा रं, वल्हवा रं नाव वल्हवली,
वल्हवा रं नाव वल्हवली, वल्हवा रं नाव वल्हवली ।।

नौका चाले कशी जलावरी–जलावरी–जलावरी,
आहे सारा भार मुलांवरी–मुलांवरी–मुलांवरी
लहान वीर–महान धीर,
रोखील वादळ वल्हवा रं – वल्हवली ।।१।।

मोकाट पिसाट वारा आला – येऊ द्या रं, येऊ द्या रं,
डोंगरमापाच्या लाटा आल्या – येऊ द्या रं, येऊ द्या रं,
छाती अफाट – झेलेल लाट,
रोखील वादळ वल्हवा रं – वल्हवली ।।२।।

झेंडा माथ्यावर तीन रंगी – तीन रंगी – तीन रंगी,
संचारवी जोम नव अंगी – नव अंगी – नव अंगी
डोले कसा – बोले कसा,
धैर्यानं नाव तुम्ही वल्हवा रं – वल्हवली ।।३।।

स्वातंत्र्य दौलत मोलाची रे – मोलाची रे – मोलाची रे,
सर्वांच्या जिवाच्या तोलाची रे – तोलाची रे – तोलाची रे,
ती एक आस – तो एक ध्यास
जोसानं नाव आता वल्हवा रं – वल्हवली ।।४।।

– वसंत बापट

- **शिक्षकांनी गाण्याची एकेक ओळ तालासुरात साभिनय म्हणून दाखवावी.विद्यार्थी त्यांच्यामागे साभिनय गाणे म्हणतील.**
- **ध्वनिफिती, ध्वनिमुद्रिका , मोबाईल इ.साहित्य वापरून कवितांची चाल ऐकावावी.**
- **एखाद्या विद्यार्थ्याला गाणे म्हणण्यास सांगावे.इतर विद्यार्थी त्यांच्या मागे म्हणतील.**
- **शिक्षक विद्यार्थ्यांची कविता,गाणी,समूहगीते लक्षपूर्वक ऐकतात. तालासुरात, साभिनय का लयीत ते जाणून घ्यावे.**

## सक्षम बनू या -:

• शिक्षकांनी कविता,गाणी या संबोधावर  विद्यार्थ्यांशी चर्चा करावी. जसे:- कविता, गाण्यांचे विविध विषय, त्यातील भावार्थ, कवितेची रचना, कवितेची लय, चाल इ.
• शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील विविध कवितांचा थोडक्यात परिचय करून द्यावा.
•शिक्षकांनी  विद्यार्थ्यांना गाण्यास विविध चाली लावण्याचा प्रयत्न करण्यास सांगावे.
• विद्यार्थ्यांनी गाण्यास  लावलेल्या विविध चालींचे ध्वनिमुद्रण मोबाईलवर करावे व  ऐकवावे.  कवितेस सर्वात चांगली चाल लावणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक करावे.
•विद्यार्थ्यांना गाण्यातील कठीण शब्द शोधण्यास सांगावे. त्यांचा अर्थ शब्दकोशात शोधून त्यांचा संग्रह 'माझा शब्दसंग्रह 'या वहीत करावा.
•  कवितेत आलेले नादमय शब्द शोधण्यास सांगावे.

## चला सराव  करू या -:

विद्यार्थ्यांचा  गटात/वैयक्तिकरित्या गाणे तालासुरात , साभिनय म्हणण्याचा सराव घ्यावा.

## • कल्पक होऊ या (आव्हाने): -

•पाठ्यपुस्तकात आलेल्या कवितांना वेगवेगळ्या चाली लावण्यास सांगावे. त्यांचे वर्गात सादरीकरण करून घ्यावे.
•विद्यार्थ्यांना माहीत असलेल्या कोळी गीते , पारंपरिक गीते - नागपंचमीची गाणी,नवरात्रीतील भोंडल्याची गाणी, आपल्या बोलीभाषेतील गाणी इ. अशा गाण्यांचा शोध घेण्यास सांगावे व त्यांचे सादरीकरण करून घ्यावे.

## पूरक साहित्य स्रोत   :-

किशोर मासिके, गाण्यांच्या/कवितांच्या ध्वनिफिती, ध्वनिमुद्रिका, मोबाईल, इतर बालसाहित्य इ.

दुसरा/तिसरा
दिवस

**क्षेत्र – मौखिक भाषा विकास**

**कौशल्ये / क्षमता :- चर्चा करणे,प्रश्न विचारणे,आपले मत देणे, तर्क करणे, निष्कर्ष काढणे इ.**

**संबोध :- चित्रकथा**

**अध्ययन निष्पत्ती:-** ५.०१.०१ ऐकलेल्या ,वाचलेल्या साहित्यातील ( विनोदी, साहसी, सामाजिक विषयांवरील कथा, कविता इ.) विषय,घटना, चित्र,पात्र व शीर्षक यांबाबत चर्चा करतात, प्रश्न विचारतात, आपले मत देतात ,तर्क करतात व निष्कर्ष काढतात.

६.०१.१८ पाठ्यविषय( पाठ,कविता, विनोद ,गाणी इ.) लक्षपूर्वक ऐकून आनंद घेतात.

## जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्रांचे निरीक्षण करायला सांगावे. प्रत्येक चित्रात काय दिसते, ते विचारावे. चित्रकथेचे प्रकट वाचन करावे. विद्यार्थ्यांकडून वाचून घ्यावे. चित्रातील विषयाशी संबंधित अनुभव विद्यार्थ्यांना विचारावेत. विद्यार्थ्यांनी दिलेल्या उत्तरावरून अनुभव तक्ते तयार करून घ्यावेत. वाचून घ्यावे. वर्गात या प्रसंगाचे सादरीकरण करून घ्यावे.




• विद्यार्थी चित्रकथेचे वाचन कशा प्रकारे करतात? प्रसंगाचे सादरीकरण कसे करतात? यावरून चित्रकथेची समज कितपत आहे हे जाणून घ्यावे.

## सक्षम बनू या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्रकथेविषयी परिचय करून द्यावा.
•चित्रकथेतील घटना/प्रसंग, पात्रे, संवाद,चित्रकथेची सुरूवात, शेवट इ. विषयी चर्चा करावी.
•शिक्षकांनी विदयार्थ्यांना 'बंडूची इजार ' या चित्रकथेतील चित्रांचे निरीक्षण करण्यास सांगावे.
• विद्यार्थ्यांना चित्रांतील पात्रांविषयी प्रश्न विचारून बोलते करावे.
उदा. •गोष्टीतील पात्रे कोणती? • गोष्टीत कोणता प्रसंग घडला असेल? •गोष्टीतील पात्रे एकमेकांशी काय बोलत असतील? •गोष्टीत पुढे काय घडले असेल? •गोष्टींचा शेवट काय झाला असेल?



•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्रकथा साभिनय वाचून दाखवावी.
•विदयार्थ्यांचे पाच गट करावेत.एक निवेदक व इतर ४ पात्रे मुलांमध्ये वाटून द्यावे.
•बंडूची इजार या चित्रकथेचे एकेका गटाचे साभिनय सादरीकरण करून घ्यावे.
•शिक्षकांनी चित्रकथेवर आधारित प्रश्न विचारावेत.
उदा. • गोष्टीतील पात्रांची नावे सांगा. • तुम्हाला कोणते पात्र आवडले?का?
• गोष्टीत कोणता प्रसंग घडला ? • घडलेला प्रसंग क्रमाने सांगा.

• गोष्टींचा शेवट बदलायचा असेल तर गोष्टीतील कोणता कथाभाग तुम्हाला बदलावासा वाटतो?
•तुमच्या घरी एखादा विनोदी प्रसंग घडला आहे का?त्या प्रसंगाविषयीचा तुमचा अनुभव सांगा.

## चला सराव करू या

•विद्यार्थ्यांना  बंडूची इजार या चित्रकथेचे साभिनय सादरीकरण करण्याचा सराव करून घ्यावा.
•विद्यार्थ्यांनी  बंडूची इजार ही गोष्ट स्वत:च्या शब्दात सांगावी.

## • कल्पक होऊ या

●शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मराठी बालसाहित्यातील विविध चित्रकथांचा शोध घेण्यास सांगावे.आवडलेल्या चित्रकथेची   नाटयीकरणाची तयारी करायला सांगावी  व त्याचे सादरीकरण करून घ्यावे.

● शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे  समान गट करावेत. गटास वही, पेन घेऊन बसण्यास   सांगावे. प्रत्येक गटास एक गोष्ट तयार करण्यास सांगावी. तयार झालेल्या गोष्टीच्या नाटयीकरणाचा सराव करण्यासाठी १० मिनिटे वेळ द्यावा.

●वर्गासमोर प्रत्येक गटाच्या गोष्टीचे साभिनय  नाट्यीकरण  घ्यावे.

## पूरक साहित्य स्त्रोत

किशोर मासिकांतील चित्रकथा , गोष्टींची पुस्तके , मुलांसाठीचे साप्ताहिक अंक  व  इतर बालसाहित्य

चौथा दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती

संबोध :- चित्रवर्णन

**अध्ययन निष्पत्ती:-** १) आपल्या परिसरात घडणारे प्रसंग , घटना इत्यादीचे सूक्ष्म निरीक्षण करतात. त्यावर तोंडी प्रतिक्रिया , व्यक्त करतात , प्रश्न विचारतात.
२) रेडिओ , दूरदर्शन, वर्तमानपत्र , इंटरनेट याद्वारे पाहिलेल्या , ऐकलेल्या घटना स्वताच्या शब्दात मांडतात .

## जाणून घेऊ या



शिक्षक प्रसंग चित्र दाखवतील (बाजार / निसर्ग चित्र) . चित्र वाचन घेतील . चित्रावर प्रश्न विचारतील . चित्रात दिसणारा प्रसंग , वस्तू , प्राणी घटनेवर प्रश्न विचारून चर्चा करतील . चित्रात काय दिसते, चित्रातून काय समजते यावर प्रश्न विचारतील . मुलांनी दिलेली उत्तरे ( वर्णन ) फळ्यावर लिहितील . लिहिलेल्या वर्णनाचे वाचन घेतील .यासाठी भाषा पेटीतील A4 साईज चित्रे वापरतील.

## सक्षम बनू या

“ क्रीडा महोत्सव “ या विषयावर आठ ते दहा ओळी दिलेल्या मुद्द्यानुसार लेखन करणे .शिक्षक मुद्दे देतील .शाळेत साजरा होणाऱ्या “ क्रीडा महोत्सवात “ कोणकोणत्या बाबींचा समावेश असतो प्रथम यावर प्रश्नाद्वारे चर्चा घेतील.पाठ्यपुस्तकात दिलेल्या मुद्द्याच्या आधारे “ क्रीडा महोत्सव “ अहवाल लिहिण्याबाबत मार्गदर्शन करतील. पान नंबर ११ वरील “ क्रीडा महोत्सव “ या विषयावर मुद्दे पाहून आठ ते दहा ओळी लेखन करण्यास सांगतील .

## चला सराव करू या

**शाळेतील स्नेह संमेलनाचे वर्णन तुमच्या शब्दांत करा .**

## • कल्पक होऊ या

**तुम्हाला आवडलेली घटना / प्रसंग याचे वर्णन तुमच्या शब्दांत लिहा . तुमच्या गावातील एखाद्या व्यावसायिकाचे निरीक्षण करून त्याच्या कामाचे वर्णन करा.**

## पूरक साहित्य स्त्रोत

**मुलभूत वाचन साहित्य पेटीतील चित्र , इतर मासिकातील विद्यार्थी उपयोगी चित्र.**

पाचवा   दिवस

क्षेत्र – भाषाभ्यास
कौशल्ये / क्षमता :- नाम ओळखणे, वापर करून लेखन करता येणे

.संबोध :- नाम

अध्ययन निष्पत्ती - 05.01.10-भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन  करतात.

06.01.28- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा  लेखनात योग्य वापर करतात.

## जाणून घेऊ या

शिक्षकांनी फळ्यावर वस्तू, प्राणी, व्यक्ती, ठिकाण व गुण असे रकाने पाडून पुढे खेळाची सूचना द्यावी.
सूचना: प्रत्येक गटाने मी अशी खूण(√) करेल त्याच रकान्यात नावे लिहिण्यासाठी गटातील एका विद्यार्थ्याने पुढे यावे, वेळ संपण्याची अशी खूण(.) करेल तेव्हा थांबावे.

## सक्षम बनू या

रकान्यातील या नावांना 'नाम' म्हणतात असे सांगून रकान्याच्या शीर्षकांच्या मदतीने नामाची व्याख्या तयार करण्यास सांगावी. आवश्यक तेथे मदत करावी.
विद्यार्थ्यांनी गटात चर्चा करून आपल्या गटाने तयार केलेली व्याख्या सांगावी.  सर्व गटांच्या व्याख्यांची तुलना करून योग्य व्याख्या विद्यार्थ्यांच्या मदतीने बनवावी.

**निरनिराळ्या वस्तूंच्या, प्राण्यांच्या ,व्यक्तींच्या, ठिकाणांच्या नावांना ' नाम' असे म्हणतात.**

## चला सराव करू या

शिक्षकांनी भाषा पेटीतील विविध नामांच्या चित्र कार्डांचा उपयोग करून  किंवा  नामे देऊन विद्यार्थ्यांकडून  वाक्य तयार करून घ्यावी.

जसे :    झाड, नदी,

## • कल्पक होऊ या

पुढील आद्याक्षरांपासून नाम तयार करण्यास सांगावे.

प, स, त, ब, र, क.

## पूरक साहित्य स्त्रोत

भाषा साहित्य पेटी संच क्रमांक -२०

सहावा दिवस

क्षेत्र – मौखिक भाषा विकास

कौशल्ये / क्षमता :- :- सूक्ष्म निरीक्षण करणे,तोंडी प्रतिक्रिया देणे, प्रश्न विचारणे.

संबोध :- संवाद आकलन

## अध्ययन निष्पत्ती :-

**५.०१.०२ आपल्या परिसरात घडणारे प्रसंग ,घटना इत्यादींचे सूक्ष्म निरीक्षण करतात .त्यांवर तोंडी प्रतिक्रिया व्यक्त करतात ,प्रश्न विचारतात.**

**६.०१.०२ पाहिलेल्या व ऐकलेल्या घटना याविषयी न अडखळता बोलतात. प्रश्न विचारतात.**

### जाणून घेऊ या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील संवाद काळजीपूर्वक वाचण्यास सांगावा.

"अहो बाई, काय म्हणून काय विचारता? वाहतुकीचा नियम मोडलात तुम्ही!"
"मी कधी मोडला?"
"अहो, पुढची गाडी पुढे गेली म्हणून, मी ही गाडी पुढे आणली. मुसळधार पावसामुळे सिग्नलकडे लक्ष नाही गेलं."
"असं म्हणून, कसं चालेल? वाहतुकीचे नियम तुमच्या संरक्षणासाठीच असतात ना."
"आणि हे काय, हेल्मेटही नाही घातलं तुम्ही! त्याचाही दंड आकारतो थांबा!"
"अहो जरा घाईत होते हो, म्हणून विसरले"
"हेल्मेट तुमच्या सुरक्षेसाठीच असतं ना!"
"हो, खरं आहे, नियमानुसार तुमचा जो काही दंड आहे, तो घ्या तुम्ही!"

● शिक्षकांनी संवादावर आधारित प्रश्न विचारून विद्यार्थ्यांना संवादाचे आकलन कितपत झाले हे जाणून घ्यावे.

**उदा. १) वरील संवादात किती जणांचा सहभाग आहे? २) वरील संवाद कोठे घडला असावा? ३) बाईंनी वाहतुकीचा नियम कशा प्रकारे मोडला? ४) बाईंनी वाहतुकीचा नियम का मोडला असेल? ५) वाहतुकीचे नियम का केलेले आहेत? ६) वाहतुकीचे नियम मोडले तर काय होते? ७) तुम्हांला असा गर्दीचा अनुभव आला आहे का? कसा?**

## सक्षम बनू या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील चित्राचे निरीक्षण करण्यास सांगावे व संवाद वाचण्यास सांगावा.



केशव : बापरे! किती ही गर्दी आणि किती ह्या गाड्या!

बाबा : तू आज पाहतोस होय ही गर्दी! रोजच अशी गर्दी असते इथे.

केशव : एवढी सगळी माणसं कुठं चालली असतील बरं! ह्या सगळ्या गाड्यांना किती पेट्रोल, डिझेल लागत असेल?

बाबा : आणि वाहनातून निघणाऱ्या धुराचं काय?

केशव : गर्दी, धूर, वाहनांचे आवाज, कर्कश हॉर्न... कधी एकदाचं इथून लांब जातोय, असं झालं आहे मला.

• संवादाचे वाचन करताना पात्रांची संख्या, त्यांची भूमिका,विरामचिन्हे , आवाजातील चढउतार इ.गोष्टी लक्षात घेऊन वाचन करावे हे विद्यार्थ्यांना लक्षात आणून द्यावे.

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील प्रश्नांची स्वत:च्या शब्दांत उत्तरे देण्यास सांगावे.

नमुना प्रश्न:-

१) तुम्ही कधी गर्दी असलेल्या रस्त्यावर गेला आहात का ? २) रस्त्यावर कोणत्या वेळेला जास्त गर्दी असते? का असते? ३) वाहतूक कोंडीमुळे कोणत्या समस्या निर्माण होतात? ४) वाहतूक कोंडी होऊ नये यासाठी काय काय केले पाहिजे असे तुम्हांला वाटते? ५) वाहतूक कोंडीमुळे कोणकोणत्या प्रकारचे प्रदूषण होते? ६) हे प्रदूषण कमी होण्यासाठी काय काय करता येईल?

## चला सराव करू या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना चित्रांवर आधारित संवाद, शाब्दिक संवाद वाचनास द्यावेत.

•संवादावर आधारित आकलनात्मक व स्वत:चे अनुभव कथन येणारे प्रश्न विचारावेत.

## • कल्पक होऊ या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकात आलेली वेगवेगळ्या प्रसंगावर आधारित चित्रे शोधण्यास सांगावी.चित्रातील व्यक्ती काय बोलत असतील? याची चर्चा करावी. त्यावर आधारित प्रश्न तयार करून घ्यावेत.

## पूरक साहित्य स्त्रोत

किशोर मासिके , गोष्टींची पुस्तके , भाषा पेटीतील चित्रवर्णनाची कार्डे, इतर बालसाहित्य, वर्गातील मुलांनी तयार केलेले संवादात्मक उतारे इ.

सातवा/आठवा
दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती
संबोध :- संवाद लेखन

**अध्ययन निष्पत्ती :**

१) आपल्या परिसरात घडणाऱ्या घटनाबाबत बारकाईने निरीक्षण करून त्यावर लिखित स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त करतात .

२) पाहिलेल्या , ऐकलेल्या गोष्टी / घटना मुद्दे यांना स्वत:च्या भाषेत कथन करतात , लिहितात .

**जाणून घेऊ या**





चित्राचे निरीक्षण करायला सांगतील . चित्रातील फुगेवाला व मुले काय बोलत असतील . शेजारील मुलगी काय विचारेल यावर विविध प्रश्न विचारून चर्चा करतील. त्याआधारे संवाद म्हणजे काय ते समजावतील. वरील चित्र पाहून मुलांना संवाद लेखन करण्यास मार्गदर्शन करतील. लिहिलेल्या संवादाचे सादरीकरण करून घेतील.

## सक्षम बनू या

खालील विषयावर संवाद लेखन करण्यास सांगतील. संवाद लिहिताना कोणत्या मुद्द्याचा विचार करावा यावर चर्चा घेतील . खालील संवाद लिहून घेतील .

१)आई व मुलगा बाजारात जाताना

२)मैदानात शिक्षक व विद्यार्थी

३)फुलपाखरु आणि मी

केलेल्या संवादाचे संवादाचे सादरीकरण करून घेतील.

## चला सराव करू या

१) झाड व पक्षी यातील संवाद

२) पतंग आणि मुलगा यातील संवाद

## • कल्पक होऊ या

'मला देव भेटला तर' अशी कल्पना करा व तुम्ही देवाशी काय बोलाल ते लिहा.

## पूरक साहित्य स्त्रोत

किशोर मासिक , गोष्टीची पुतके , इतर बालसाहित्य.

नववा दिवस

क्षेत्र – भाषाभ्यास

कौशल्ये / क्षमता :- सर्वनाम ओळखता येणे, वापर करून लेखन करता येणे.

संबोध :- सर्वनाम

अध्ययन निष्पत्ती - 05.01.10-भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

06.01.28- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात.

## जाणून घेऊ या

( शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी खालील प्रमाणे संवाद करावा.)

चला, फळ्यावरील मी लिहिलेली वाक्ये वाचू या.

ताई आली.ताईने निळा ड्रेस घातला होता.

ताई आली. तिने निळा ड्रेस घातला होता.

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वरील दोन वाक्यातील फरक विचारावा.

( दुसऱ्या वाक्यात 'ताईने' च्या जागी 'तिने' असे लिहिले आहे. )

अजून काही वाक्य वाचू या.

राम माझा मित्र आहे. राम हुशार आहे. रामला खेळायलाही आवडते.

राम माझा मित्र आहे. तो हुशार आहे. त्याला खेळायलाही आवडते.

दुसऱ्या वाक्यात राम एकदाच लिहिले आहे. नंतर 'तो' आणि 'त्याला' असे लिहिले आहे.

अगदी बरोबर ,बोलताना किंवा लिहिताना आपण असेच करतो . सारखे काही नाव घेत नाही. एकदा नाव घेतल्यानंतर नामाच्या ऐवजी तो, ती, ते, त्याचे, त्याला, त्याने असे जे शब्द आपण वापरतो त्यांना सर्वनाम म्हणतात. सर्वनाम हे मुलांच्या, व्यक्तीच्या, वस्तूंच्या नावाऐवजी वापरतात असे आणखी काही शब्द पहा तुम्हाला आठवतात का?

## सक्षम बनू या

विद्यार्थ्यांना  खालील परिच्छेद वाचण्यास सांगावे.

माझ्या बहिणीचे नाव सायली. तिला सगळे लाडूबाई म्हणतात. कारण ती सगळ्यांची लाडकी आहे आणि लाडूसारखी गोल आहे. तिला अजून चालता येत नाही. ती रांगत सगळ्यांकडे जाते.

(खालील प्रमाणे सूचना देऊन परिच्छेदातील संबंधित नाम शोधण्यास सांगावे.)

वरील परिच्छेदात जे शब्द ठळक केले आहेत ते कोणत्या नामाऐवजी वापरले आहेत.

ते नाम खाली दिलेल्या नामामध्ये आहे का ?असेल तर त्या पुढे अशी खूण(√) करा.

लाडू [     ]     माझ्या [     ]     सायली [     ]

## चला सराव करू या

पुढील  परिच्छेदात आलेली नामे व  त्याऐवजी आलेली सर्वनामे चौकटीत लिहिण्यास सांगावे.

ताईची प्रत्येक गोष्ट विद्याला हवी असे. क्रीमच्या नव्या डबीवर  तिचा डोळा होता. एकदा संधी साधून तिने ती उघडली आणि बचकभर क्रीम तोंडाला फासून घेतली.

| नाम | सर्वनाम |
|---|---|
| | |
| | |

## • कल्पक होऊ या

योग्य तेथे सर्वनाम वापरून खालील परिच्छेद पुन्हा लिहा. सई एका मोठ्या खोलीमध्ये गेली. तिथे सईला मघाचा बुटका विदूषक आपले पाय वर करून हातांवर चालताना दिसला. सईला फारच राग आला. "खोटारडा!" सई ओरडली.

## पूरक साहित्य स्त्रोत

भाषा साहित्य पेटी संच क्रमांक -१५

दहावा दिवस

क्षेत्र – मौखिक भाषा विकास
कौशल्ये / क्षमता :- तोंडी अभिव्यक्ती

संबोध :- मुलाखत

**अध्ययन निष्पत्ती :- ५.०१.०२ आपल्या परिसरात घडणारे प्रसंग,घटना इ.चे सूक्ष्म निरीक्षण करतात. त्यांवर तोंडी प्रतिक्रिया व्यक्त करतात.**
**६.०१.२५ आपल्या परिसरातील व्यक्तीचे शब्दचित्र रेखाटतात.**

## जाणून घेऊ या

• शिक्षिकांनी विद्यार्थ्यांशी पुढील प्रश्नांसंदर्भात चर्चा करावी.
१) तुम्हांला कोणकोणते खेळ आवडतात?    २) तुमचा सर्वात आवडता खेळ कोणता?
३) तुम्हांला वैयक्तिक खेळातील कोणता खेळ अधिक आवडतो?तो का आवडतो?
४) तुम्हांला मैदानी खेळ आवडतात की बैठे खेळ?की दोन्ही?ते खेळ का आवडतात?
५ तुम्हांला माहित असलेल्या धावपटूंची नावे सांगा. ६) तुमच्या आवडत्या खेळाडूंची नावे सांगा.
७) तुमच्या आवडत्या खेळाडू विषयी माहिती सांगा.
शिक्षकांनी वरीलप्रमाणे विविध प्रश्न विचारून विद्यार्थी कितपत बोलतात हे जाणून घ्यावे.

## सक्षम बनू या

•शिक्षकांनी कविता राऊत या खेळाडूविषयी माहिती सांगावी.
• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना मुलाखत कशी घ्यावी याविषयी थोडक्यात मार्गदर्शन करावे.
~मुलाखतीचे तीन घटक असतात.१) मुलाखत दाता :- असामान्य कर्तृत्वाचा ठसा उमटवणारी, प्रश्नांना उत्तरं देणारी म्हणजे मुलाखत देणारी व्यक्ती. २) मुलाखतकार :- प्रश्न विचारणारी म्हणजे मुलाखत घेणारी व्यक्ती. ३) मुलाखतीचे वाचक, प्रेक्षक व श्रोते.

**~मुलाखतकारास मुलाखतीचा विषय, मुलाखतकाराची संपूर्ण माहिती असावी. पूर्वतयारीत विषयाला समर्पक अशी प्रश्नावली तयार असावी.**
**~ मुलाखतकाराने वेळेचे योग्य नियोजन करावे.**
**~ एका विद्यार्थ्याला कविता राऊत या खेळाडूची अभिरूप मुलाखत देण्यास सांगावे.**
**● आपल्या आवडत्या खेळाडूची मुलाखत घेणे यासाठी विद्यार्थ्यांच्या जोड्या कराव्यात.**
**तयारीसाठी १० मिनिटे वेळ द्यावा.नंतर मुलाखतीचे सादरीकरण घ्यावे**

## चला सराव करू या

• विद्यार्थ्यांना आपल्या मित्रमैत्रिणींची मुलाखत घेण्यास सांगावे.

## • कल्पक होऊ या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना परिसरात असलेल्या विविध व्यावसायिक, प्रसिद्ध व्यक्ती यांची मुलाखत घेण्यासाठी प्रश्नावली करण्यास सांगावे.

## पूरक साहित्य स्त्रोत

विद्यार्थ्यांनी घेतलेल्या मुलाखतींचा लेखी संग्रह, चांगल्या मुलाखतीच्या ध्वनिमुद्रिका इ.

अकरावा/बारावा
दिवस

**क्षेत्र** – लेखन
**कौशल्ये / क्षमता :-** स्वअभिव्यक्ती
**संबोध :-** चित्रावर / दिलेल्या विषयावर प्रश्न तयार करणे

## अध्ययन निष्पत्ती :

१) ऐकलेल्या , वाचलेल्या साहित्यातील विषय ( विनोदी साहित्य , सामाजिक विषयावरील कथा , कविता इत्यादीमधील ) घटना , चित्र , पात्र व शीर्षक याबाबत चर्चा करतात . स्वतंत्र मत देतात . प्रश्न विचारतात , आपली स्वतंत्र टीप देतात , तर्क लावतात व निष्कर्ष काढतात.

२) पाहिलेल्या व ऐकलेल्या घटना ( स्थानिक , सामाजिक घटना कार्यक्रम ) या विषयी न अडखळता बोलतात व प्रश्न विचारतात .

## जाणून घेऊ या




चित्र दाखवून चित्राविषयी माहिती मिळविण्यासाठी कोणते प्रश्न विचाराल यावर चर्चा घेतात . चित्र कसले आहे ? चित्रात काय काय दिसते ? चित्र कशाविषयी आहे ? अशा प्रकारचे प्रश्न विचारून चर्चा घेतील . त्यानुसार तयार झालेले प्रश्न लिहिण्यास सांगतील . तयार झालेले प्रश्न लिहिण्यास सांगतात.

## सक्षम बनू या

झाड , पाणी , नदी याविषयी माहिती मिळविण्यासाठी ते आपल्याशी बोलत आहेत असे समजून प्रश्न बनवा . शिक्षक विद्यार्थ्यांना सदर उपक्रम समजावून सांगतील व प्रश्न तयार करून घेतील.
झाड आपणास कसे उपयोगी आहे , पाणी आणि नदी यांचे महत्त्व व त्याची योग्य काळजी का घ्यावी या आधारे यांचे सर्वांचे महत्त्व समजून घेण्यासाठी त्यांना कोणते प्रश्न विचारायला हवे यावर चर्चा करतात . प्रश्न बनविण्यास सांगतात.

## चला सराव करू या



चित्र पहा व चित्रातील वैमानिकाला त्याच्या कामाविषयी प्रश्न विचारा.
चित्रातील व्यक्ती कोण आहे ?
तिचे काम आपल्याला जाणून घ्यायचे आहे या मुद्द्याचा विचार करून प्रश्न तयार करण्यास सांगतात.

## • कल्पक होऊ या

१) तुमच्या परिसरातील एखाद्या कारागिराची माहिती मिळविण्यासाठी प्रश्न तयार करा.
२) तुमच्या परिसरातील रिक्षाचालक , एस. टी चालक यांच्याशी संवाद साधण्यासाठी १० प्रश्न तयार करा.

## पूरक साहित्य स्त्रोत

भाषा साहित्य पेटीतील चित्र.

तेरावा दिवस

क्षेत्र – भाषाभ्यास
कौशल्ये / क्षमता सामान्यरूप ओळखता येणे, वापर करून लेखन करता येणे .
संबोध :- सामान्यरूप

अध्ययन निष्पत्ती- 05.01.10-भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

06.01.28- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात.

## जाणून घेऊ या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांना फळ्यावर लिहिलेले खालील वाक्य वाचण्यास सांगावे.)
खालील वाक्य वाचा.

मी पुस्तक घाई नव्हती

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाक्यातील प्रत्येक शब्दाचा दुसऱ्या शब्दाशी काहीतरी संबंध आहे असे वाटते का ? असे विचारून

वरील वाक्यावरून काय समजते सांगा? वरील वाक्य समजण्यासाठी किंवा अर्थ स्पष्ट होण्यासाठी विद्यार्थ्यांच्या मदतीने क्रियापदाला खालीलप्रमाणे काही प्रश्न विचारावे.

काय नव्हती? - घाई नव्हती.
कोणाला नव्हती? - मला नव्हती.
कशाची घाई नव्हती? - पुस्तकाची घाई नव्हती.
आता'मला पुस्तकाची घाई नव्हती', असे वाक्य तयार झाले व अर्थ ही स्पष्ट झाला.

## सक्षम बनू या

| सर्वनाम /नाम | सामान्यरूप | तयार शब्द |
|---|---|---|
| मी | म + ला | मला |
| पुस्तक | पुस्तका + ची | पुस्तकाची |

(वरील तक्त्यावरून विद्यार्थ्यांकडून सामान्यरूप याची व्याख्या तयार करून घ्यावी.)

प्रत्यय जोडून घेण्यासाठी नाम किंवा सर्वनाम स्वत:मध्ये काही वेळा बदल करतात त्याला त्यांचे 'सामान्यरूप' म्हणावे.

## चला सराव करू या

**(शिक्षकांनी  गटात  खालील सूचनेप्रमाणे भाषिक खेळ घ्यावा.)**

### जादूची पोतडी

**खालील पोतडीतील दोन गटात खेळ खेळताना एकाने त्यातील नाम घेऊन मोठ्याने उच्चारावे. दुसऱ्याने प्रथम 'आलामंतर छू!' असे म्हणावे आणि नंतर त्या शब्दाचे सामान्यरूप सांगावे. ज्याला सामान्यरूप तयार करता येणार नाही त्याच्यावर भेंडी चढेल ; आणि ज्याच्यावर भेंड्या कमी असतील तो जिंकेल.**




## • कल्पक होऊ या

नाम व सर्वनाम  यांना प्रत्यय न लावता एक अर्थपूर्ण परिच्छेद तयार करा .

## पूरक साहित्य स्त्रोत

पाठ्यपुस्तक उतारा

चौदावा दिवस

क्षेत्र – वाचन

कौशल्ये / क्षमता :- माहिती मिळवणे, माहितीचे उपयोजन, सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचता येणे.

संबोध :- सूचना फलक व जाहिरात वाचन

**अध्ययन निष्पत्ती** :- ५.०१.०५ भिन्न परिस्थिती आणि उद्देशांसाठी फलकावरील सूचना, कार्यअहवाल, माहिती इ.मिळवण्यासाठी वाचतात, लिहितात.

६.०१.१५ सार्वजनिक ठिकाणच्या सूचना समजपूर्वक वाचतात.

**जाणून घेऊ या**

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील सूचनाफलक वाचण्यास सांगावे.यासारखे आणखी नमुने तयार करण्यास सांगावे.




• विद्यार्थ्यांनी वहीत तयार केलेली सूचनाफलके पाहावीत व त्यांना सूचनाफलक कितपत लिहिता आला हे जाणून घ्यावे.

## सक्षम बनू या

●शिक्षकांनी विद्यार्थ्यांना सूचनाफलक का व कशासाठी लिहिले जातात याची माहिती सांगावी.

●शिक्षकांनी जाहिरातीचे विषय ,तयार करण्याचे उद्देश, त्याचे महत्त्व याविषयी वर्गात चर्चा घडवून आणावी.

●विद्यार्थ्यांना खालील जाहिरात लक्षपूर्वक वाचण्यास सांगावी व त्यावर आधारित प्रश्न विचारावेत.




१) वरील जाहिरात कशाशी संबंधित आहे? २) सहलीसाठी किती विद्यार्थ्यांना प्रवेश देणार आहेत? ३) सहलीची फी किती रूपये आहे? ४) वरील जाहिरात कोणी दिली आहे? ५) सहभागी विद्यार्थ्यांना कोणती तयारी करण्यास सांगितली आहे? ६)पक्षी निरीक्षण सहलीसाठी कोणते स्थळ निवडले आहे? ७) सहल किती दिवसांची आहे?८) सहलीचे आयोजन फेब्रुवारी महिन्यात का केलेले आहे? ९) जाहिरातीत सुवर्णसंधी हा शब्द का वापरला असेल?

## चला सराव करू या

• विद्यार्थ्यांना परिसरात , वर्तमानपत्रात ,मासिकात ,पुस्तकात आलेले सूचना फलक व जाहिराती वाचण्यास सांगावे. • विद्यार्थ्यांना जाहिरातींवर आधारित प्रश्न तयार करण्यास सांगावे व सोडवून घ्यावेत.

## • कल्पक होऊ या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून वेगवेगळ्या सामाजिक समस्यांवर आधारित सूचनाफलक, घोषवाक्ये, सुविचार तयार करून वर्गात तसेच शालेय परिसरात लावावे. तसेच माहितीपूर्ण, उपयुक्त जाहिराती तयार करून घ्याव्यात.

## पूरक साहित्य स्रोत

वर्तमानपत्रे, मासिके, इ - वर्तमानपत्रे, किशोर मासिके, विद्यार्थ्यांनी तयार केलेले सूचनाफलक, जाहिराती इ.

पंधरावा दिवस

: राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे :

इयत्ता-६ वी.

गुण-१५

सेतू अभ्यास चाचणी क्र.१ (दिवस पहिला ते चौदा)

**विषय- मराठी**

**विद्यार्थ्याचे नाव** ------------------------------------------------------------------------------------

**प्रश्न:१. खालील वाक्य वाचून सामान्य रूप सांग. (तोंडी) (गुण-१.)**

**तातू भाकरीला तूप लावून खातो.**

**प्रश्न:२. उतारा वाचून खालील प्रश्नांची उत्तरे द्या. (गुण-४)**

बबू, गबू आणि डबू बोरे आणायला गेले.
बबूने बोरे पाडली. गबूने बोरे पाडली.
डबूला बोरे पाडताच येईनात.
डबूने बबूकडे बोरे मागितली.
पण बबूने बोरे दिलीच नाहीत.
मग डबूने गबूकडे बोरे मागितली.
गबूनेही बोरे दिली नाहीत.
डबू रडू लागला.
मग बबूने डबूला बोरे दिली.
गबूने पण डबूला बोरे दिली.
डबूला मजा आली. तो हसला.

**अ) बबू, डबु आणि गबू काय आणायला गेले ?**
**आ) डबू का रडू लागला ?**
**इ) डबुला बोरे का पाडता आली नसतील, तुझ्या शब्दात लिही.**
**ई) उताऱ्यात आलेली नामे सांग. (तोंडी)**

**प्रश्न:३. संवाद काळजीपूर्वक वाचून प्रश्नांची उत्तर सांग. (तोंडी) (गुण-३)**

दादा: "केतन, हे बघ."
केतन: "काय? पिपाणी! मला दे ना."
दादा: "नाही देणार.. माझी आहे."
केतन: "दे ना रे दादा."
दादा: "ही नाही."
केतन: "नवी दे."
दादा: "देईन. मला काय देणार?"
केतन: "बेदाणे."
दादा: "पिपाणी घे. बेदाणे दे."

**क) बेदाणे कोण देणार आहे ?**
**ख) संवादात किती माणसे बोलत आहेत ?**
**ग) पिपाणी कोणाकडे आहे ?**

**प्रश्न:३.उतारा वाचून प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण-३)**

" आई गं, मी एक पुस्तक टेबलावर ठेवलं होतं, ते कुणी पाहिलं का?" मुग्धाने विचारले, "ते माझं नव्हतं, माझ्या मैत्रिणीचं होतं. त्याला लाल कागदाचं कव्हर घातलं होतं. आतल्या पानावर तिचं नावही होतं. आज ते तिला परत करायचं आहे. सांग ना, तू पाहिलंस का ते ? " ती रडवेल्या आवाजात म्हणाली.

**१) मुग्धाचा आवाज का रडवेला होता ?**
**२) उताऱ्यात आलेले दोन नाम लिही.**
**३) तुम्ही लिहीलेल्या नामासाठी उताऱ्यात आलेले सर्वनाम लिहा,**

**प्रश्न:४.चित्रातील व्यक्ती बघ आणि दोन वाक्य लिही. (गुण-२)**



**प्रश्न:५. तू वाचलेल्या कोणत्याही दोन सूचना लिही? (गुण-२)**

सोळावा दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती
संबोध :- सूचना फलक तयार करणे

## अध्ययन निष्पत्ती :

१) भिन्न परिस्थितील उद्देशानुसार आपले मत व्यक्त करतात , लिहितात व वाचतात . उदा. फलकावरील सूचना .

२) मराठी भाषेतील विविध साहित्य सामुग्री , वृत्तपत्र , पत्रिका , कथा , माहिती देणारी साधने , इंटरनेटवर प्रसिद्ध होणारे साहित्य समजपूर्वक वाचतात त्यावरून आपली आवड निवड स्वभाषेत व्यक्त करतात .

### जाणून घेऊ या

**सूचना फलक**

दि. २३–९–२०१८

कपोत परिसराला पाणीपुरवठा करणाऱ्या पाइपलाइनच्या दुरुस्तीचे काम तातडीने हाती घेण्यात आले आहे. त्यामुळे उद्या दि.२४–९–२०१८ रोजी आपल्या परिसराचा पाणीपुरवठा बंद राहील.

कपोत परिसरवासीयांनी याची नोंद घ्यावी व शक्य तेवढी पाण्याची काटकसर करून सहकार्य करावे.

– सेक्रेटरी

पान क्रमांक ६१ वरील सूचना वाचून , सूचना का लावली आहे यावर चर्चा करतात. तुम्ही परिसरात कोणत्या सूचना वाचल्या आहेत . त्या का लावल्या जातात .

वेगवेगळ्या वाचलेल्या सूचनांची नावे लिहून घेतात .

सूचना फलक का लिहितात याविषयी चर्चा करतात.

## सक्षम बनू या



वरील चित्र पाहून या चित्रात कोणत्या सूचना सूचना फलकात लिहाव्यात असे तुम्हाला वाटते .

## चला सराव करू या

तुमच्या गावात सूचना फलकावर लावलेल्या कोणती सूचना तुम्ही वाचली आहे ती तुमच्या शब्दात लिहिण्यास सांगतील

## • कल्पक होऊ या

१) तुम्हाला आवडणाऱ्या एखाद्या विषयावर सूचना फलक तयार करा.

२ ) महत्त्वाच्या विषयावर ( स्वच्छता , आरोग्य , प्रदूषण ) सूचना लिहा.

## पूरक साहित्य स्त्रोत

वर्तमानपत्र , किशोर मासिक , भाषा साहित्य पेटीतील चित्र.

सतरावा दिवस

क्षेत्र – भाषाभ्यास

कौशल्ये / क्षमता - संयोग चिन्ह ओळखणे, वापर करून लेखन करता येणे.

संबोध :- संयोगचिन्ह

अध्ययन निष्पत्ती - 05.01.10-भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

06.01.28- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात.

## जाणून घेऊ या

(शिक्षकांनी फळयावरील खालील परिच्छेद विद्यार्थ्यांना वाचण्यास सांगावे.)

खालील परिच्छेद वाचा.

या शाळेत पण मी फुली-गोळ्यांचा खेळ पंधरा-वीस जणांना शिकव-
लाय. जो-तो हा खेळ खेळण्यास उत्सुक असतो. आम्ही तो खेळ मधल्या सुट्टीत खेळतो.

वरील परिच्छेदात संयोग चिन्ह किती वेळा आले आहे ? असे विविध चिन्ह देण्याचे काय कारण असावे? असे प्रश्न विचारून विद्यार्थ्यांसोबत चर्चा करावी.

## सक्षम बनू या

म्हणजे काही वेळा आपण शब्द एकत्र करून वापरतो; पण एकत्र आल्यामुळे त्यांच्या मूळ रूपात काही बदल मात्र होत नाही. म्हटले तर ते शब्द स्वतंत्र असतात ,आणि तरीही त्यांचा वापर एकत्रितपणे होत असतो. अशा वेळी त्यांच्यामध्ये एक लहानशी रेघ देऊन ते जोडण्याची पद्धत असते तिलाच संयोग चिन्ह असे म्हणतात.

वरील परिच्छेदात हे चिन्ह आपण दोन कारणांनी वापरले आहे

1)दोन शब्द जोडताना. 2) ओळीच्या शेवटी शब्द अपुरा राहिल्यास.

लक्षात ठेवूया

- हे संयोग चिन्ह आहे. ----- हे संयोग चिन्ह नाही.

## चला सराव करू या

**शिक्षकांनी खालील प्रमाणे विविध वाक्यांचा वर्गात सराव घ्यावा.**

**खालील वाक्यात योग्य ठिकाणी संयोगचिन्हाचा वापर करा.**

**1) दोन तीन अक्षरी शब्द लिहा.**

**2) त्याची लांबी रुंदी सारखी असते.**

**3) काल मुंबई पुणे महामार्गावर दोन अपघात झाले.**

## • कल्पक होऊ या

पाठ्यपुस्तकातील पान क्रमांक देऊन संयोग चिन्ह शोधण्यास सांगावे

## पूरक साहित्य स्त्रोत

किशोर मासिक

## अठरावा दिवस

**क्षेत्र** – वाचन
**कौशल्ये / क्षमता :-** स्व अभिव्यक्ती
**संबोध :-** बातमी वाचन

अध्ययन निष्पत्ती :- ५.०१.०४विविध प्रकारच्या साहित्यातील संवेदनशील मुद्यांवर आपले मत/विचार व्यक्त करतात.

५.०१.०६ आपल्या पाठ्यपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य ( वर्तमानपत्रे, बालसाहित्य,मोठे फलक इ.) समजून घेऊन वाचन करतात, त्याविषयी बोलतात.

६.०१.०४ रेडिओ, दूरदर्शन, वर्तमानपत्रे ,इंटरनेट यांद्वारे पाहिलेल्या घटना स्वतःच्या शब्दांत मांडतात.

### जाणून घेऊ या

शिक्षकांनी बातम्यांसंदर्भात विद्यार्थ्यांना प्रश्न विचारावेत.

जसे-१) तुम्ही बातम्या कोठेकोठे ऐकता,पाहता? २) बातम्या कोणत्या विषयांवर असतात?

३) बातम्या का ऐकल्या/पाहिल्या पाहिजे? ४) बातम्यांचे उपयोग कोणते?

५) बातम्या कितपत खऱ्या किंवा खोट्या असतात असे तुम्हांला वाटते?

### सक्षम बनू या

- शिक्षकांनी बातमी वाचन याविषयी मार्गदर्शन करतात.जसे - बातमीचे उद्देश, आवश्यकता,बातमीचे वाचन लेखन , बातमीतील विश्वासार्हता,बातमीची प्रसारमाध्यमे ,बातमीचे विषय इ.बाबी सांगतात.
- खालील बातमी विद्यार्थ्यांकडून बारकाईने वाचून घ्यावी. त्याबाबतची अधिक माहिती वर्गात सांगावी. त्यावर वर्गात चर्चा आयोजित करावी.



## वाचन प्रेरणा दिन उत्साहात साजरा...

आदर्शनगर, ता. १६ : दि.१५ ऑक्टोबर रोजी साधना विद्यालय, आदर्शनगर येथे वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे औचित्य साधून विद्यालयात अनेक स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमाची सुरुवात ग्रंथदिंडीने करण्यात आली. आदर्शनगर परिसरातील महत्त्वाच्या चौकांत 'वाचनसंस्कृती वाचवा' या विषयावर मुलांनी पथनाट्ये सादर केली. त्याचबरोबर विद्यालयात 'उत्कृष्ट वाचन' ही स्पर्धा घेण्यात आली. यात मुलांनी त्यांच्या आवडत्या कथा, कवितांचे वाचन केले. या स्पर्धेत इयत्ता सातवीतील शेखर काजळे या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट वाचक' म्हणून बक्षीस देण्यात आले. पुढील काळामध्ये वाचनसंस्कृती विकसित व्हावी, या दृष्टीने विद्यालयात विविध उपक्रम राबवले जाणार असल्याचे मुख्याध्यापकांनी या प्रसंगी घोषित केले. विद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांनी अतिशय उत्साहाने वाचन प्रेरणा दिन साजरा केला.

**•शिक्षकांनी वरील बातमीच्या आधारे खालील प्रश्न विचारावेत.**
**१) कोणाचा जन्मदिवस आपण वाचन प्रेरणा दिन म्हणून साजरा करतो?**
**२) वरील बातमी कोणत्या तारखेची आहे? ३)वाचन प्रेरणा दिनाच्या निमित्ताने कोणकोणत्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे? ४)कोणत्या विद्यार्थ्यास 'उत्कृष्ट वाचक' म्हणून बक्षीस देण्यात आले? ५) विद्यार्थ्यांमध्ये वाचनकौशल्य वाढावे , यासाठी शाळेत कोणकोणते उपक्रम आयोजित करता येतील यावर गटचर्चा करा. त्याची यादी तयार करा.६) तुमच्या शाळेत**
**वाचन प्रेरणा कशा प्रकारे साजरा करण्यात येतो?**

### चला सराव करू या

**• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकात,वर्तमानपत्रात ,इ -वर्तमानपत्रे आलेल्या विविध विषयांवरील उदा.शिक्षण, आरोग्य,क्रीडा, आपत्ती इ.संदर्भातील  बातम्या वाचनास द्याव्यात.त्यांवर चर्चा घडवून आणावी.**

### • कल्पक होऊ या

**• शिक्षकांनी  विद्यार्थ्यांना विविध प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणाया बातम्यांचेश्रवण-/वाचन करण्यास सांगावे.**
**• विद्यार्थ्यांना एखादा विषय देऊन संबंधित बातम्यांचे संकलन करण्यास सांगावे.उदा.क्रीडा.**

### पूरक साहित्य स्रोत

**वर्तमानपत्रे, इ - वर्तमानपत्रे, दूरदर्शन, आकाशवाणी वरील बातम्या इ.**

एकोणिसावा
दिवस

**क्षेत्र** – लेखन
**कौशल्ये / क्षमता :-** स्वअभिव्यक्ती.
**संबोध :-** जाहिरात लेखन

## अध्ययन निष्पत्ती :

१) भाषेतील बारकावे , नियम , इत्यादीचा विचार करून स्वत:ची भाषा तयार करतात आणि त्याचा आपल्या लेखनात समावेश करतात .

२) मराठी भाषेतील विविध साहित्य सामुग्री , वृत्तपत्र , पत्रिका , कथा , माहिती देणारी साधने , इंटरनेटवर प्रसिद्ध होणारे साहित्य समजपूर्वक वाचतात त्यावरून आपली आवड निवड स्वभाषेत व्यक्त करतात .

### जाणून घेऊ या

शिक्षक जाहिरातीचे मुलांकडून वाचन करून घेतील . जाहिरात म्हणजे काय ? समजावून देतील . जाहिरातीचे लेखन कसे करावे . कोणकोणते मुद्दे विचारात घ्यावेत याची चर्चा करून मुद्द्यांचे फळ्यावर लेखन करून घेतील . दिलेली जाहिरात कोणती आहे ? कशाची विक्री आहे ?



## सक्षम बनू या




वर चित्रात दिलेल्या जाहिरातीवर ५ ते ६ प्रश्न तयार करून घेतील .

## चला सराव करू या

दिलेल्या विषयावर जाहिरात तयार करून घेतील . दिलेल्या मुद्द्यावर चर्चा घेतील .

१) मुलांसाठी चित्र जत्रा ( महत्वाचे मुद्दे – वार , दिनांक , ठिकाण , वयोगट , नाव नोंदणी आणि सूचना )

## • कल्पक होऊ या

तुमच्या शाळेत आयोजित करावयाच्या पुस्तक प्रदर्शनाची जाहिरात तयार करा.

## पूरक साहित्य स्त्रोत

जाहिरात नमुने ( कात्रणे ) , वर्तमानपत्र

विसावा दिवस

क्षेत्र – भाषाभ्यास
कौशल्ये / क्षमता :- विशेषण ओळखता येणे, वापर करून लेखन करता येणे.
संबोध :- विशेषण

अध्ययन निष्पत्ती - 05.01.10- भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.
06.01.28- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात.

**जाणून घेऊ या**

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी खालील प्रकारे संवाद करावा.)

शिक्षकांनी बाहुली कशी ? असा प्रश्न मुलांना विचारावा.



तुम्ही जे शब्द सांगितले त्यामुळे बाहुलीबद्दल आपल्याला काय कळले?
माहिती मिळाली, वर्णन कळले.
(विद्यार्थ्यांच्या मदतीने व्याख्या तयार करावी.)
अशाच नामाबद्दल माहिती देणा-या शब्दांना विशेषण म्हणतात.

## सक्षम बनू या

(खालील सूचनेप्रमाणे वर्गात कृती घ्यावी. )

पुढील वाक्यातील विशेषण शोधा. त्यासाठी अगोदर नाम शोधा. मग त्याचे वर्णन करणारी विशेषण सहज सापडतील, ते खालील चौकटीत लिहा.

1) "ही मुलगी हुशार आहे बरं का !"

2) नदीकाठी मऊ माती होती, काळेभोर खडक होते आणि दाट झाडी होती, पाणी खोल नव्हते; पण स्वच्छ होते.

| विशेषण | नाम |
|---|---|
| | |
| | |
| | |

## चला सराव करू या

पुढे दिलेल्या विशेषणाचे योग्य रूप वापरून वाक्य पूर्ण करा.

1) इवलासा

"अगोबाईऽ !---------बाहुली आणि तिचा---------- पाळणा !आणि दागिनेसुद्धा -------------! किती गोड !! "

2) विद्यार्थ्यांना आद्यक्षरापासून बनवलेल्या नामांचे तयार पत्ते करण्यास सांगावे.मुलांनी गटात बसून एक-एक पत्ता उचलावा व आठवून वर्णन करणारे शब्द सांगून यादी करावी.

## • कल्पक होऊ या

खालील प्रमाणे वर्गात भाषिक खेळाचा सराव घ्यावा. भाषिक खेळातील अटींमध्ये वर्ग स्तरावर परिस्थितीप्रमाणे बदल करावा.

सांगा सांगा लवकर सांगा.

मुलांनी वर्तुळाकार बसावे. एका मुलाने सुरुवात करावी. 'सांगा सांगा ऽऽ लवकर सांगा' असे दोन टाळ्यांच्या तालावर म्हणावे. नंतर त्याच तालावर प्रश्न विचारावा. या ठिकाणी नाम ,सर्वनाम ,विशेषण कोणत्याही एकाचे दोन उदाहरणे सांगा असे म्हणावे. पुढच्या मुलाने ती उदाहरणे सांगावीत. त्यापुढच्या मुलांनाही वेगळी दोन उदाहरणे द्यावीत.

उत्तर येत नसल्यास पुढे चला म्हणावे. मात्र प्रश्नानंतर उत्तर येणे आवशक्य आहे. उत्तर देणे किंवा पुढे चला म्हणणे यापैकी एकही न करता आल्यास तो मुलगा बाद होईल. याप्रमाणे शेवटपर्यंत जो मुलगा राहील तो जिंकेल.

उदा. सांगा सांगा (टाळ्या )लवकर सांगा (टाळ्या).
विशेषणे- सांगा (टाळ्या)

पुढचा मुलगा- सुंदर (टाळ्या) गोड (टाळ्या)
दुसरा मुलगा - उंच (टाळ्या) गोरा (टाळ्या)
याप्रमाणे खेळत राहावे.

पुढील चौकटीत अनेक विशेषणे आहेत आणि त्यातच त्यांच्या विरुद्ध अर्थाची विशेषणे आहेत.त्यांच्या जास्तीत जास्त जोड्या शोधून लिहा.

| | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| क्ष | म | त | बो | ल | का | दा | प्र | न | अं | की | अ |
| ने | शां | न | रा | ज | का | ट | भ | थ | ति | टु | भि |
| ट | प्रि | स | मो | क | म | न | शि | बी | म | का | मा |
| का | ह | तु | ट | क | सू | च | अ | खं | ड | र | ना |
| सू | खो | अ | क्ष | री | ळा | ळ | स्व | र | नि | कौ | स्प |
| लो | ड | बो | शे | ला | टा | व | उ | तुं | ग | र | द |
| णी | क | ल | आ | ख | डू | ळ्या | री | ग | ळ | का | स |
| वि | र | ळ | पा | ळ | त | भा | रा | भ | र | र | म |
| स्वा | बा | स्थू | ख | न | शी | ब | वा | न | सु | खु | द्वा |
| ग | मी | ल | ज्जा | स्प | द | शा | प्र | का | आ | प | जा |

------शांत------ X -----खोडकर-----

------------- X ----------------

**पूरक साहित्य स्त्रोत**

भाषा साहित्य पेटी संच क्रमांक -३३ व ५७

एकविसावा दिवस

क्षेत्र – वाचन
कौशल्ये / क्षमता :- आरोह, अवरोहासह, विरामचिन्हासह प्रकटवाचन
संबोध :- प्रकटवाचन

**अध्ययन निष्पत्ती :- ५.०१.०६ आपल्या पाठ्यपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य (वर्तमानपत्रे , बालसाहित्य, मोठे फलक इत्यादी) समजून घेऊन वाचन करतात , त्यांविषयी बोलतात.**

**६.०१.११ विभिन्न साहित्यप्रकारांत लिहिलेल्या लेखनसाहित्याचे आरोह-अवरोहासह व योग्य गतीने वाचन करतात.**

**६.०१.२२ पाठ्यपुस्तक व इतर साहित्याचे अर्थानुसार समजपूर्वक प्रकार वाचन करतात.**

## जाणून घेऊ या

**•शिक्षकांनी विद्यार्थ्यांकडून खालील उताऱ्याचे प्रकटवाचन करून घ्यावे.**



निसर्ग अभ्यासाची पहिली पायरी म्हणजे पक्षीनिरीक्षण. अगदी पक्षांसारखे आकाशात उडण्याचे स्वप्न पाहणाऱ्या माणसाने पक्ष्यांना समोर ठेवूनच विमानाचा शोध लावला होता. राइट बंधूंनी विमान बनवण्याआधी अनेक देशांमध्ये अनेक संशोधक आकाशात उडण्याचे वेगवेगळे प्रयोग करत होते. अगदी पक्षांची पिसे वापरून त्याचे मोठे पंख तयार करूनही उडण्याचे प्रयत्न झाले आहेत! खरंच पक्षीविश्व इतके अद्भुत आणि रम्य आहे, की लेखक, कवी, गीतकार, संगीतकार, चित्रकार, शिल्पकार अशा अनेकांना अजरामर रचना करण्यास पौराणिक काळापासून प्रेरणा देत आले आहे. या पृथ्वीवर अशी एक इंच जागा नाही, जिथे पक्ष्यांची सावली पडली नसेल. पक्षीनिरीक्षण हा 'शून्य' पैसे खर्च येणारा जगातला लोकप्रिय छंद आहे.

**• शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे प्रकटवाचन योग्य प्रकारे आहे का हे जाणून घ्यावे.**

## सक्षम बनू या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रकटवाचन कसे करावे याविषयी मार्गदर्शन करतात.

√प्रकटवाचन हे मोठ्या आवाजात, स्पष्ट, अचूक उच्चारासह, विरामचिन्हे लक्षात घेऊन करावे.

√ प्रकटवाचन सलग,सहज असावे. √ प्रकटवाचन करताना आरोह अवरोहासह,बलाघातासह करावे.

**• शिक्षकांनी खालील उताऱ्याचे एक आदर्श प्रकटवाचन वर्गात करून दाखवावे. विद्यार्थ्यांना लक्षपूर्वक ऐकण्यास व पाहण्यास सांगावे.**

एकदा सानेगुरुजी रेल्वेने प्रवास करत होते. त्यांच्या शेजारचे प्रवासी शेंगा, संत्री खात होते. टरफले, साली खाली टाकत होते. त्यांचे खाऊन झाल्यावर गुरुजी उठले. टरफले, साली गोळा केल्या. कागदात बांधून ठेवल्या. गुरुजी आपल्या जागेवर बसले. शेंगा खाणाऱ्या प्रवाशांना खंत वाटली नाही. नंतर पुढच्या स्टेशनवर एक प्रवासी त्या डब्यात चढला. सानेगुरुजींना पाहताच त्याने वाकून नमस्कार केला, तेव्हा शेजारची प्रवासी मंडळी चमकली. त्यांनी चौकशी केली. चौकशी करताच ते सानेगुरुजी आहेत, हे त्यांना कळले. ते सर्वच खजील झाले व म्हणाले, ''गुरुजी, आमचे चुकले. क्षमा करा.''

गुरुजी नम्रपणे म्हणाले, ''मी कोण तुम्हांला क्षमा करणार ? गाडीमध्ये आपण सर्वजण बसतो, प्रवास करतो. गाडी स्वच्छ ठेवणं ही सर्वांचीच जबाबदारी आहे. गाडी घाण होऊ नये, म्हणून मी ती स्वच्छ केली.''

अशी ही गुरुजींची वृत्ती ! आपल्या जीवनात कोणतेही काम त्यांनी कधीच हलके मानले नाही.

**• प्रत्येक विद्यार्थ्याकडून वरील उताऱ्याचे प्रकटवाचन करून घ्यावे. प्रकटवाचन करताना आढळून आलेल्या चांगल्या बाबी सांगाव्यात तसेच काही त्रुटी असतील तर त्या सांगाव्यात.**

**• शिक्षक विद्यार्थ्यांना खालील नमुना उतारे प्रकटवाचनासाठी देतील.**

रत्नागिरी जिल्ह्यातील प्रियांका सुट्टीनिमित्त आई व अमित सोबत मामाच्या गावी गेली. एके दिवशी ती कपडे धुण्यासाठी आई व अमित सोबत नदीवर गेली असताना काठावर खेळणारा अमित पाय घसरून नदीच्या पाण्यात पडला व बुडू लागला. आई घाबरून गेली. प्रियांकाने प्रसंगावधान राखून, धुण्यातील एक साडी घेतली. साडीचे एक टोक तिने अमितकडे फेकले. अमितने ते टोक पकडले.

प्रियांकाने साडी हळूहळू ओढून अमितचे प्राण वाचवले.

प्रियांकाच्या धाडसाची दखल घेऊन तिला 'बालशौर्य पुरस्कार' देऊन गौरविण्यात आले.

कीटकवर्गात सर्वांत जास्त उदयोगी, कष्टाळू, शिस्तप्रिय व हुशार म्हणून मुंग्यांचे नाव सर्वप्रथम घेतले जाते. मुंगी हा समाजप्रिय कीटक वसाहत करून राहतो.मुंग्या परिस्थितीनुसार विशिष्ट गंधकण सोडतात.या गंधकणांच्या साहाय्याने त्या इतर मुंग्यांच्या संपर्कात राहतात व आपले संरक्षण ,शत्रूवर हल्ला, अन्नसाठा इ. कार्ये करतात.स्वतःचे आणि वसाहतीचे संरक्षण करण्यासाठी तत्पर असतात.

## चला सराव करू या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना प्रकटवाचनाचा सराव गटागटात करून घ्यावे.यासाठी गटप्रमुखाची मदत घ्यावी.
- तसेच मोबाईलवर प्रत्येक विद्यार्थ्याच्या प्रकटवाचनाचे ध्वनिमुद्रण करता येईल.ते परत ऐकवून विद्यार्थ्यांना त्यांचे प्रकटवाचन तपासता येईल.घरी अशाच प्रकारे प्रकटवाचनाचा वैयक्तिक सराव करता येईल.

## • कल्पक होऊ या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकात असलेल्या पाठांतील उतारे,किशोर मासिकातील मजकूर, गोष्टींची पुस्तके इ.मधून निवडण्यास सांगावेत.
- घड्याळात वेळ लावून प्रकटवाचनास लागणारा वेळ तपासता येईल.
- प्रकटवाचनासाठी घेतलेल्या मजकूरावर आधारित प्रश्न तयार करून विद्यार्थ्यांना विचारावेत.

## पूरक साहित्य स्त्रोत

भाषापेटीतील उतारे असलेले कार्ड्स, किशोर मासिके, गोष्टींची पुस्तके, इ -बालसाहित्य, गोष्टींची पुस्तके, ग्रंथालयातील पुस्तके इ. मुलांसाठीचे साप्ताहिक अंक ( उदा.बालमित्र)

बाविसावा
दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती
संबोध :- घटनाक्रम

## अध्ययन निष्पत्ती :

१) पाठ्यपुस्तक आणि इतर लेखन प्रकारातील संवेदनशील विषयावर लिखित स्वरूपात अभिव्यक्त होतात .

२) पाहिलेल्या , ऐकलेल्या गोष्टी / घटना मुद्दे याना स्वत:च्या भाषेत कथन करतात , लिहितात .

## जाणून घेऊ या

काही वाक्याचे नमुने देऊन त्याचा योग्य क्रम लावण्यास सांगतील.

उदाहरणार्थ – घरी आल्यावर आंबे धुतले.

आजी बाजारात गेली.
आंब्याचा रस केला .
तिने आंबे आणले.
बाजारात भरपूर फळे होती.

पिठाची छान भाकरी भाजली.
रमाने गहू आणले.
गहू गिरणीत दळून आणले.
तिने ते स्वच्छ निवडले .
सर्वांनी भाकरी आवडीने खाल्ली.

शिक्षक वरील घटना किवा वाक्य क्रमाने लिहून घेतील. त्याचे वाचन करून घेतील व घटनाक्रम समजावतील.

## सक्षम बनू या

१)चित्र पाहून घटनेचा क्रम लिहिण्यास सांगतील . चित्राविषयी चर्चा करतील . पाऊस , वर, झाडे , सूर्य , ढग हे सर्व पाऊस पडताना कसे उपयोगी पडतात यावर प्रश्नाद्वारे चर्चा घडवतील . ( पाऊस कसा पडतो) घटनेचा क्रम लिहिल्यावर वाचन घेतील .



२) चित्र पाहून घटनेचा क्रम लिहा (झाडाची वाढ)

**चित्रावर चर्चा घेतील . आपण कधी बी लावली आहे का ?**

**बी लावल्यावर झाडाची वाढ कशी कशी होत जाते या मुद्द्यांवर प्रश्न विचारतील ,**

**घटनेचा क्रम लिहून घेतील .**



## चला सराव करू या

**१) तुम्ही अनुभवलेली एखादी घटना वा प्रसंग आठवून ती क्रमाने लिहा.**

**२) तुमच्या वर्गाला विज्ञान प्रदर्शनाचे आयोजन शाळास्तरावर करावयाचे आहे तुम्ही कोणकोणती तयारी कराल ते क्रमाने लिहा.**

## • कल्पक होऊ या

**पिके कापायला आली तेव्हापासून धान्याची रास होईपर्यंत कोणकोणती कामे करावी लागतात ते क्रमाने लिही.**

## पूरक साहित्य स्त्रोत

**मूलभूत वाचन साहित्य पेटीतील घटनाक्रम साहित्य , उपलब्ध समांतर साहित्य.**

तेविसावा  दिवस

क्षेत्र – भाषाभ्यास

कौशल्ये / क्षमता :- क्रियापद ओळखणे,वापर करून लेखन करणे.

संबोध :- क्रियापद

अध्ययन निष्पत्ती -05.01.10- भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

06.01.28- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात.

## जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांशी पुढील प्रकारे संवाद करावा.

आंबा

वाचा पाहू मी फळ्यावर कोणता शब्द लिहिला आहे.

कळला का अर्थ ?

'आंबा लिहिलं आहे.'

पण आंब्याचे काय?

विद्यार्थ्यांकडून जाणून घ्यावे.

उदा.- मला आंबा आवडतो.

मी आंबा खातो .

मी आंबा खाते.

नुसत्या आंबा शब्दावरून आपल्याला काही कळत नाही .आंब्याचे आपण काय काय करतो ते सांगितलं की मात्र समजते.हे शब्द वाक्याला अर्थ प्राप्त करून देतात.हे शब्द काहीतरी कृती सांगणारेआहेत. यालाच क्रियापद म्हणतात.

## सक्षम बनू या

शिक्षकांनी खालील प्रमाणे विविध प्रकारची क्रियात्मक उदाहरणे देऊन विद्यार्थ्यांकडून जास्तीत जास्त क्रियापदांचा सराव करून घ्यावा.

एखादी कृती करायची म्हणजेच एखादी क्रिया करायची असेल तर तिच्यात अनेक क्रिया दडलेल्या असतात .

पाहू या पुढील वाक्य

'आई स्वयंपाक करते.'असे आपण पटकन म्हणतो,तर मग सांगा पाहू 'स्वयंपाक करणं म्हणजे काय, काय करणं असतं ?'

उदा -निवडणे, कापणे ,भाजणे, गाळणे........................

## चला सराव करू या

1) ***ते कोण?***

ते रुजते,उगवते/अंकुरते,पालवते,वाढते,तरारते,बहरते,मोहरते,फुलते,डोलते, हिंदोळते,सळसळते, झडते,वाळते, वठते.

2) तुझा दररोजचा दिनक्रम कसा आहे ते लिही.

## • कल्पक होऊ या

1) फळयावरील उताऱ्यात वाक्य पूर्ण करणारे एकही क्रियापद दिसत नाही. तुम्हाला योग्य वाटेल ती क्रियापदे योग्य त्या पद्धतीने वापरून हा उतारा पुन्हा लिहून काढा.

एक प्रसन्न संध्याकाळ. वातावरणात सनईचे सूर, मोग-याचा सुगंध आणि नव्या रेशमी वस्त्रांची ऐकू येणारी सळसळ. हलक्या आवाजातील कुजबुज आणि मध्येच कुणाचे तरी खळखळते हास्य.माझ्यासमोरच्या वृद्ध आजोबांचे अर्धे लक्ष घड्याळाकडे आणि अर्धे आपल्या रांगणाऱ्या नातवाकडे. 'कुणीतरी लवकर सोडवा मला यातून', असा आजोबांच्या चेहऱ्यावर भाव.

2) पुढील प्रत्येक आद्यक्षरांपासून नाम , विशेषण, क्रियापद तयार करा आणि खालील दिलेल्या उदाहरणातील वाक्याप्रमाणे प्रत्येक आद्यक्षरांपासून वाक्य तयार करा.

त, म, ग, च, ट, ब, स, श

| उदा. | नाम | विशेषण | क्रियापद |
|---|---|---|---|
| क | कप | काळा | करतो |
| प | पर्वत | पांढरा | पडेल |

## पूरक साहित्य स्त्रोत

भाषा साहित्य पेटी संच क्रमांक -३३ व ५७

## चोविसावा दिवस

**क्षेत्र – वाचन**
**कौशल्ये / क्षमता :- रसास्वाद,कविता समजून घेणे,कवितेचे आकलन**
**संबोध :- कविता**

**अध्ययन निष्पत्ती:-** ५.०१.०५ भिन्न परिस्थिती आणि उद्देशांसाठी वाचतात,लिहितात.
६.०१.२३ वर्तमानपत्रे, मासिके व पुस्तके यांतील बालसाहित्याचे समजपूर्वक वाचन करून आस्वाद घेतात, संग्रह करतात.

### जाणून घेऊ या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील कवितेच्या ओळी वाचण्यास सांगावे.

सूर्य रोज रंगवितो आभाळाची कोरी पाटी
निसर्ग राजा तुझ्या दप्तरात किती मोठी रंगपेटी!

उष्ण सोनेरी पोशाख ह्या सूर्याच्या अंगात
उगवतो, मावळतो, लाल केशरी रंगात
बहु रंगांच्या चित्रांची, तुझ्या वहीवर दाटी।।

सुर्यफूलाच्या पिकाला रंग देतोस पिवळा
काळ्या शिवारी फुलवी शुभ्र कपाशीचा मळा
पिकांवर शिंपतो तू रंग हिरवा पोपटी।।

मोठ्या रंगीत खडूने रंगवितो आभाळाला
रात्रीसाठी काळा रंग सांग किती तू आणला?
सप्तरंग हे तूच दिले इंद्रधनुष्यासाठी।।

शिक्षकांनी वरील कवितेवर आधारित प्रश्न विचारावेत.

नमुना प्रश्न :- १) कवितेमध्ये किती रंगांचा उल्लेख आला आहे?कोणते ? २) निसर्गात रंगीबेरंगी अनेक गोष्टी आढळतात हे कवितेतील कोणत्या ओळीवरून समजते? ३) उष्ण सोनेरी पोशाख कोणी घातला आहे? ४) मोठी रंगपेटी कोणाच्या दप्तरात आहे? ५) इंद्रधनुतील सप्तरंगाची नावे सांगा.

- वरीलप्रमाणे अजून प्रश्न विचारून विद्यार्थ्यांनी दिलेल्या प्रतिसादावरून कविता कितपत समजली हे जाणून घ्यावे.

## सक्षम बनू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना कवितेचा भावार्थ समजून घेऊन कवितेचे आकलन कसे होते हे समजावून सांगावे. कवितेचा भावार्थ समजून घेणे, अपरिचित शब्दांचा अर्थ शोधणे, कवितेतील मुख्य कल्पना समजणे इ.

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील कविता वाचण्यास सांगावे.


पुस्तकं सांगतात गोष्टी
युगायुगांच्या.
माणसांच्या जगाच्या,
वर्तमानाच्या–भूतकाळाच्या.
एकेका क्षणाच्या!
जिंकल्याच्या–हरल्याच्या,
प्रेमाच्या–कटुतेच्या!
तुम्ही नाही का ऐकणार
गोष्टी पुस्तकांच्या?
पुस्तके काही करू इच्छितात,
तुमच्याजवळ राहू इच्छितात.
पुस्तकांत पाखरं चिवचिवतात.
पुस्तकांत आखरं सळसळतात.
पुस्तकांत निर्झर गुणगुणतात.
पुस्तकं परीकथा ऐकवतात.
पुस्तकात रॉकेटचे तंत्र आहे,
पुस्तकात विज्ञानाचा मंत्र आहे.
पुस्तकांची दुनिया न्यारी आहे,
ज्ञानाची उत्तुंग भरारी आहे!
तुम्हांला नाही का जायचं?
पुस्तकांच्या विश्वात?
पुस्तकं काही सांगू इच्छितात,
तुमच्या जवळ राहू इच्छितात.

● शिक्षकांनी कवितेतील अवघड / अपरिचित शब्द विचारावेत.

● कवितेचा भावार्थ समजून सांगावा.

● विद्यार्थ्यांना स्वत:च्या शब्दांत कवितेचा समजलेला अर्थ विचारावा.

● शिक्षकांनी कवितेवर आधारित प्रश्न विचारावेत.

नमुना प्रश्न :-

१) पुस्तके कोणकोणत्या गोष्टी सांगतात, असे कवितेत म्हटले आहे?

२) पुस्तके तुमच्याजवळ का राहू इच्छितात?

३) आपण पुस्तकांच्या विश्वात जायला हवे, असे कवीला का वाटते?

४) पुस्तकांचे विश्व कसे असते? ५) पुस्तकांच्या दुनियेत काय मिळते?

६) पुस्तकांचे जग वेगळे असते, याबद्दल शिक्षक,पालक, मित्रांशी चर्चा करा.

७) तुमचे पुस्तक चांगल्या अवस्थेत राहावे यासाठी तुम्ही कोणती काळजी घ्याल?

८) पुस्तक तुमच्याशी बोलते आहे अशी कल्पना करा व सांगा.

९) छापलेले पुस्तक व ई पुस्तक यांपैकी तुम्हाला कोणते पुस्तक वाचायला आवडेल? का?

१०) तुम्हाला शिक्षकांच्या मदतीने शिकायला आवडेल की पुस्तकांच्या मदतीने? का?

११) तुमचे पुस्तक वाचून झाल्यावर ते इतरांना वाचायला द्यावे की नाही? का?

१२) तुम्हाला कोणत्या प्रकारच्या गोष्टींची पुस्तके वाचायला आवडतात त्यांची यादी करा.

## चला सराव करू या

• शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील, पाठ्यपुस्तकेतर साहित्यातील कविता विद्यार्थ्यांना वाचनास उपलब्ध करून द्यावीत. कवितेबाबत चर्चा करावी. त्यावर आधारित प्रश्न विचारावेत.

## • कल्पक होऊ या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना बालसाहित्यातील कविता वाचनास द्याव्यात. विद्यार्थ्यांनी त्यावर आधारित प्रश्न तयार करावेत.

• आपल्या आवडत्या कवितांचा संग्रह करावा. कवितेवर आधारित प्रश्न तयार करावेत.

## पूरक साहित्य स्त्रोत

किशोर मासिके, बालसाहित्यातील कविता, मुलांसाठीचे साप्ताहिक अंक( उदा.बालमित्र )इ.

पंचविसावा / सव्विसावा
दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती
संबोध :- अनुभव शब्दात लिहिणे

**अध्ययन निष्पत्ती :**

१) ऐकलेल्या , वाचलेल्या साहित्यातील विषय ( विनोदी साहित्य , सामाजिक विषयावरील कथा , कविता इत्यादीमधील ) घटना , चित्र , पात्र व शीर्षक याबाबत चर्चा करतात . स्वतंत्र मत देतात . प्रश्न विचारतात , आपली स्वतंत्र टीप देतात , तर्क लावतात व निष्कर्ष काढतात.

२) विविध प्रसंग व संदर्भांनुसार सांगितलेल्या गोष्टी अनुभव स्वत:च्या भाषेत लिहितात .

**जाणून घेऊ या**

१) शिक्षक विद्यार्थ्यांना त्यांच्या घरी , शेजारी कोणकोणते प्राणी आहेत , ते कसे चालतात , ते काय खातात , तसेच वेगवेगळ्या प्रसंगी त्यांनी केलेल्या कृतीचे आवाजाचे निरीक्षण करण्यास सांगतात व ते अनुभव स्वताच्या शब्दात लिहिण्यास सांगतात. काही प्राण्यांची चित्र दाखवतील .






ते कुठे पाहिलेत ? कुठे राहतात ? आपल्याला काही उपयोग होतो का ? त्यांची काळजी का व कशी घ्यावी असे प्रश्न विचारून चर्चा करतील .

२) तुमच्या घरातील मोठी माणसे टी.व्ही. वरील कोणते कार्यक्रम बघतात . तेच कार्यक्रम ते का पाहतात अनुभव तुमच्या शब्दांत लिहा.

## सक्षम बनू या

१) पावसाळ्यात परिसरात, शाळेत, शेतात केलेली मजा तुमच्या शब्दांत अनुभव लिहा.

२) शाळेची मधली सुट्टी झाली की तुम्ही काय काय करता अनुभव लिहा.

वरील विषयांवर अनुभव लिहिण्यासाठी प्रश्न विचारून चर्चा करतील .

मुद्दे :

१) पाऊस पडल्यावर वातावरणात कोणकोणते बदल होतात? शाळेत जाताना, शेतात जाताना आपण कोणकोणती मजा करतो .

२) शाळेच्या मधल्या सुट्टीची आपण आतुरतेने वाट बघतो का? वाट का पाहतो?
सुट्टीत कोणकोणते खेळ खेळतो? सुट्टीत काय काय मजा करतो?

## चला सराव करू या

सायकल शिकतांना तुम्हाला आलेला अनुभव ८ ते १० वाक्यात लिहा.

## • कल्पक होऊ या

खालील चित्र पाहा .




पतंग उडविताना माळरानावर आलेला अनुभव तुमच्या शब्दांत मांडा.

## पूरक साहित्य स्त्रोत

भाषा साहित्य पेटीतील चित्र ( प्रसंग चित्र किवा कृतींची चित्र )

सत्ताविसावा
दिवस

क्षेत्र – भाषाभ्यास
कौशल्ये / क्षमता :- काळ ओळखणे, वापर करून लेखन करता येणे.
संबोध :- काळ

अध्ययन निष्पत्ती- 05.01.10-भाषेच्या व्याकरणाचे विविध घटक ओळखतात व त्यांचा वापर करून लेखन करतात.

06.01.28- व्याकरण घटकांची माहिती घेतात व त्यांचा लेखनात योग्य वापर करतात.

## जाणून घेऊ या

(शिक्षकांनी पुढीलप्रमाणे सूचना द्यावी.)

तुम्ही आता जे काही करत आहात त्याबद्दल एक वाक्य लिहा.

तुम्ही आता काल याच वेळी काय करीत होतात त्याबद्दल एक वाक्य लिहा.

आता उद्या याच वेळी काय करीत असाल त्याबद्दल एक वाक्य लिहा.

आता तीनही वाक्यातील क्रियापदांचे निरीक्षण करून काय लक्षात येते सांगा.

(निरीक्षण करून क्रियापदाच्या रूपात पडलेला फरक विद्यार्थ्यांच्या मदतीने स्पष्ट करावा.)

क्रियापदाच्या बदललेल्या रूपावरून कशाचा बोध होतो? याबद्दल विद्यार्थ्यांसोबत चर्चा करावी.

## सक्षम बनू या

(शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या अचूक उत्तराला प्रोत्साहन द्यावे.)

उदा.- कृती किंवा क्रिया केव्हा घडली याचा बोध होतो. बरोबर.

विद्यार्थ्यांनी दिलेल्या वाक्यातील क्रियापदाच्या रूपावरून क्रिया कोणत्या काळात घडली ते लिहावे.

आज (वर्तमानकाळ ) ,काल (भूतकाळ ), उद्या (भविष्यकाळ ).

मग यावरून क्रियापदांची रूपे आणि क्रिया घडण्याचा काळ याबद्दल काय विधान करता येईल?

विद्यार्थ्यांच्या मदतीने व्याख्या तयार करावी.

## चला सराव करू या

**शिक्षकांनी खालील परिच्छेदातील क्रियापदाचा योग्य काळात बदल करून अर्थपूर्ण परिच्छेद तयार करण्यास विद्यार्थ्यांना सूचना द्यावी.**

**उद्या खग्रास ग्रहण(असणे) -------.दक्षिण आशिया खंडात बहुतेक सर्व ठिकाणी ते (दिसणे)------.मात्र भारतात सध्या वातावरण ढगाळ(असणे)-----.आणि पुढील चार दिवस ते तसेच( राहणे )-------,असा वेधशाळेचा अंदाज(असणे)--------------.काही महिन्यांपूर्वीही ग्रहण पाहण्याची संधी याच कारणांमुळे (हुकणे )-------.आता खगोलप्रेमींना पुढच्या ग्रहणासाठी आणखी काही दिवस थांबावे(लागणे) --------.**

## • कल्पक होऊ या

**शिक्षकांनी खेळाविषयी गटात सूचना द्यावी.**
**पहिल्या गटाने दुसऱ्या गटाला एक वाक्य द्यावे व त्या वाक्याचा कोणत्या काळात बदल करावयाचा ते सांगावे.**
**दुसऱ्या गटाने सूचनेप्रमाणे वाक्य न केल्यास त्या गटातील एक मुलगा पहिल्या गटातील येईल.**
**ज्या गटात जास्त मुले तो गट विजयी ठरेल .**

| गट 1 | काळ | गट 2 |
|---|---|---|
| मी आंबा खातो. | भूतकाळ. | मी आंबा खाल्ला. |

## पूरक साहित्य स्त्रोत

**भाषा साहित्य पेटी संच क्रमांक -३४**

अठ्ठाविसावा
दिवस

क्षेत्र – भाषाभ्यास

कौशल्ये / क्षमता :- शब्दकोशाचा वापर करणे.
संबोध :- माझा शब्दसंग्रह

अध्ययन निष्पत्ती :- ५.०१.०७ अपरिचित शब्दांचे अर्थ शब्दकोशामधून शोधतात.
६.०१.१२ नव्या शब्दांविषयी जिज्ञासा व्यक्त करतात. त्या शब्दांचे अर्थ जाणून घेण्यासाठी शब्दकोशाचा वापर करतात, स्वत:चा शब्दकोश तयार करण्याचा प्रयत्न करतात.

## जाणून घेऊ या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील शब्द शब्दकोशात शोधायला सांगावेत.
- विद्यार्थ्यांना शब्दकोशाचा वापर करून शब्द शोधता येतो आहे का ते जाणून घ्यावे.
- फळकूट •कांबट्या •वाकळ •फैनाबाज •ओढाळ •हालहवाल •बळीराजा •जित्राबं •हेळसांड •वेसण

## सक्षम बनू या

- शिक्षकांनी विद्यार्थ्यांना शब्दकोशामधून शब्द कसे शोधावेत याचे मार्गदर्शन करावे.
- शब्दकोशात शब्दांची मांडणी  ही अकारविल्हे नुसार असते.
- मराठी मुळाक्षरे अ ते ज्ञ या अक्षरक्रमाने आहेत.त्यांचा अनुक्रम लक्षात शब्दांच्या आद्याक्षरांची उतरती मांडणी केलेली असते.
- यासाठी क्रमवार मुळाक्षरे व बाराखडीही लक्षात घ्यावी लागते.
- शब्दकोश, ज्ञानकोश, बालकांसाठी संस्कृतीकोश तसेच आंतरजालावर उपलब्ध असलेली संकेतस्थळे यांचा संदर्भ शोधण्यासाठी उपयोग करता येतो.
- शिक्षकांनी फळ्यावर काही  शब्द द्यावेत. विद्यार्थी शब्दकोशातील शब्द पट्कन शोधतात का ते पाहावे.
- पाठ्यघटक शिकताना, बालसाहित्य वाचताना ज्या शब्दांचे अर्थ समजणार नाहीत त्या शब्दांची यादी विद्यार्थ्यांना तयार करण्यास सांगावी.

त्या शब्दांचे अर्थ शब्दकोशात शोधून त्यांचा संग्रह माझा शब्दसंग्रह या वहीत करायला सांगावे.

- इतर विषयांत ( गणित, परिसर अभ्यास, विज्ञान, समाजशास्त्र, कला इ.) येणारे नवीन शब्द व त्यांचे अर्थ शोधून माझा शब्दसंग्रह या वहीत संग्रह करून घ्यावा.

## चला सराव करू या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना दररोज दहा शब्द शब्दकोशात शोधून ते माझा शब्दसंग्रह या वहीत लिहिण्यास सांगावे.

## • कल्पक होऊ या

• विद्यार्थ्यांना  माझा शब्दसंग्रह या वहीत शब्दांचे संकलन करताना अकारविल्हेनुसार शब्द लिहिण्यासाठी पानांचे वर्गीकरण करण्यास सांगावे.जसजसे आपल्याला शब्द शोधू त्याप्रमाणे त्यांची नोंद माझा शब्दसंग्रह वहीत अकारविल्हेनुसारच करावी.

• विद्यार्थ्यांना शोधलेल्या नवीन शब्दांचे वाक्यात उपयोग करण्याची संधी देता येईल.

## पूरक साहित्य स्त्रोत

शब्दकोश, ज्ञानकोश, बालकांसाठी संस्कृतीकोश, इ - शब्दकोश  इ.

एकोणतिसावा
दिवस

क्षेत्र – भाषाभ्यास

कौशल्ये / क्षमता :- वाचन, लेखन करताना विरामचिन्हांचा जाणीवपूर्वक व योग्य वापर करता येणे.

संबोध :- विरामचिन्ह

अध्ययन निष्पत्ती- 05.01.11- भिन्न उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा जाणीवपूर्वक व योग्य वापर करतात.

06.01.06- विविध विषयांसाठी ,विविध उद्देशांसाठी लेखन करताना विरामचिन्हांचा योग्य वापर करतात.

## जाणून घेऊ या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील परिच्छेद  योग्य विरामचिन्हे घालून, परिच्छेद पुन्हा लिहिण्यास सांगावे.

हेमंत रोहनला सांगत होता अरे काल मी सिनेमाला गेलो होतो सिनेमा माझ्या आवडीचा होता पण मला तो नीट पाहता आला नाही का काय झालं होतं रोहनने विचारले अरे एक माणूस सारखा माझ्याशी बोलत होता हेमंत म्हणाला जागा बदलायची होती मग त्याचा मित्र रोहन म्हणाला अरे जागा कशी बदलणार तो माझा मामा होता त्यानेच मला सिनेमा दाखवायला आणलं होतं

## सक्षम बनू या

शिक्षकांनी काही मुले अर्थपूर्ण वाचन करून योग्य ठिकाणी विरामचिन्हे लिहितील परंतु जी मुले फक्त शब्द वाचन करतात त्यांनाअर्थपूर्ण वाचन करणाऱ्या मुलांच्या मदतीने विरामचिन्हांची ओळख करून घेण्यास सांगावे.

( शिक्षकांनी गटात खालील चर्चा करण्यास मदत करावी.)

विरामचिन्हे ही शोभेसाठी नसून प्रत्येक विरामचिन्हाला वेगळा अर्थ आहे आणि तो अर्थ, भाषेतील त्याचे कार्य आणि महत्त्व या गोष्टी समजून घेतल्या तरच त्यांचा लेखनात योग्य वापर होऊ शकतो.

भाषा पेटीतील विरामचिन्ह यांचे कार्ड दाखवून विद्यार्थ्यांकडून नावे काढून घ्यावी.

## चला सराव करू या

**भाषा म्हणजे चिन्हांचा समुच्चयच आहे. अनेक चिन्हांच्या समुच्चयातून लिखित भाषा आकाराला येते. यामध्ये विरामचिन्हांचा एक समूह आहे तो पाहा ;आणि प्रत्येक चिन्हाची तुमच्या शब्दांत माहिती सांगा.**

**. , ? ; ' …… ' " …… " - : !**

## • कल्पक होऊ या

**प्रत्येक विरामचिन्हांवर एक वाक्य तयार करा.**

**तिसावा दिवस**

**: राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे :**

**इयत्ता-६वी.**
**गुण-१५**

**सेतू अभ्यास चाचणी क्र.-२ (दिवस सोळावा ते एकोणतिसावा )**

**विद्यार्थ्याचे नाव ---------------------------------------------------------------------------------------**

**प्रश्न:१. खालील वाक्य वाच व त्याचा काळ सांग. (गुण-१)**

लहान मुलं अंगात बंडी घालीत असत.

**प्रश्न:२. अ) पुढील उतारा आरोह-अवरोहासह वाच. (गुण-१)**

कप कप काचेचा कप
कपात काय?...चहा.
मेघनाचा का नयनाचा?... नयनाचा.

कप कप काचेचा कप
कपात काय ?...ताक .
मेघनाचे का नयनाचे?...मेघनाचे.

**प्रश्न:२. ब ) वरील उताऱ्यावर दोन प्रश्न तयार करून लिही. (गुण-२)**

**प्रश्न:३. खालील शब्दांचा योग्य क्रम लावून घटनाक्रम लिही. (गुण-१)**

वाढते, मोहरते, वठते, बहरते ,पालवते, उगवते ,अंकुरते.

**प्रश्न:४. खालील शब्दासाठी चार विशेषणे लिही. (गुण-२)**

बोट

**प्रश्न:५. कोरोना -19 संक्रमण काळात तुम्ही घेतलेल्या काळजीचे दोन अनुभव सांगा. (गुण-१)**

**प्रश्न क्र.६ ते ९ . खालील कवितेवरील प्रश्न सोडवा .**

**प्रश्न:६.  कविता तालासुरात म्हणून दाखव. (गुण-१)**

ओढाळ वासरू रानी आले फिरू, कळपाचा घेरू सोडुनिया.

कानामध्ये वारे भरुनिया न्यारे,
फेरी धरी फिरे रानोमाळ.

मोकाट मोकाट अफाट अफाट,
वाटेल ती वाट धावू लागे.

विसरुनी भान, भूक आणि तहान, पायांखाली रान घाली सारे.

थकुनिया खूप सरता हुरूप,
आठवे कळप तयालागी.

फिरू जाता मागे दूर जाऊ लागे, आणखीच भागे भटकत.

पडता अंधारू लागले हंबरू,
माय !तू लेकरू शोधू येई.

**कवितेवर आधारित खालील प्रश्नांची उत्तरे लिही. (गुण-३)**

**प्रश्न:७. कवितेत आलेल्या विरामचिन्हांची नावे लिही.**
**प्रश्न:८. रानात फिरायला मिळावे म्हणून वासरू काय करते?**
**प्रश्न:९.  कवितेतील ओढाळ या शब्दाचा अर्थ तुमच्या शब्दांत सांग.**

**प्रश्न क्र.१० ते १२.खालील बातमी वाच व त्यावर आधारित प्रश्नांची उत्तरे लिही.            (गुण-३)**

पुणे- एमकेसीएल नॉलेज फाउंडेशन तर्फे इयत्ता पाचवी ते आठवीच्या दुसऱ्या सत्राच्या सर्व विषयांचे मराठी माध्यमातील शिक्षण आता दूरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवर 'टिलिमिली नाटिकां'द्वारे मनोरंजनातून देण्याचे ठरविले आहे. या अंतर्गत प्रत्येक इयत्तेसाठी दररोज दोन नाटिका याप्रमाणे 48 नाटिकांचा संच सादर केल्या जाणार आहेत. येत्या सोमवारपासूनआहे( ता.15) या नाटकांची महामालिका सुरू होणार आहे.

**प्रश्न:१०.   बातमी कशाविषयी आहे .**
**प्रश्न:११.   या कार्यक्रमात किती नाटिकांचा संच सादर केला आहे.**
**प्रश्न:१२.   हा कार्यक्रम कोणत्या प्रसारमाध्यमांद्वारे प्रसारित होणार आहे.**

एकतिसावा
दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती
संबोध :- पत्रलेखन

**अध्ययन निष्पत्ती :**

१) उद्दिष्टानुसार आवश्यक बदल करतात. उदा. एखाद्या घटनेबाबतची माहिती सांगण्यासाठी शालेय भित्तीपत्रकेसाठी लेखन करतात किंवा मित्रास पत्र लिहितात.

२) विविध प्रसंग व संदर्भांनुसार सांगितलेल्या गोष्टी अनुभव स्वत:च्या भाषेत लिहितात .

## जाणून घेऊ या

इयत्ता ५ वी पान क्रमांक २२ वरील पत्र लेखनाचे शिक्षक वाचन करतील .
पत्र कसे लिहावे याविषयी मार्गदर्शन करतील.
पत्राची सुरुवार , पत्राचा मजकूर व शेवट ह्याविषयी चर्चा करतील.
मित्राला किवा मैत्रिणीला वाढदिवसाच्या शुभेच्छा देणारे पत्र लिहिण्यास सांगतील .

## सक्षम बनू या

पत्राचा नमुना

पत्र पाठविणाऱ्याचा पत्ता

दिनांक

प्रति

मान्नीय ..........

(योग्य त्या मान पदासह ज्यांना पत्र पाठवायचे आहे त्यांचे नाव , हुद्दा व पत्ता )

विषय : ........................(पत्राचे कारण)

महोदय,

विषयानुसार मजकूर

आपला विश्वासू

पत्र पाठविणाऱ्याची सही व नाव

वरील पत्राचा नमुना दाखवून त्याप्रमाणे पत्र लिहिण्यास मार्गदर्शन करतील.

## चला सराव करू या

तुझ्या मित्राचा / मैत्रिणीचा चित्रकलेत प्रथम क्रमांक आला . अभिनंदन करणारे पत्र लिही.

## • कल्पक होऊ या

तुझ्या ५ वी च्या मराठीच्या पुस्तकातील तुला आवडलेला धडा तुला का आवडला, हे त्या धड्याच्या लेखिकेला पत्राद्वारे कळव.

## पूरक साहित्य स्त्रोत

किशोर मासिक किवा इतर पत्रांचे नमुने.

बत्तीसावा/तेहतीसावा
दिवस

**क्षेत्र – मौखिक भाषा विकास**
**कौशल्ये / क्षमता :- विषय,घटना, चित्र,पात्रं याबाबत चर्चा करणे,नाट्यवाचन**

**संबोध :- नाट्यीकरण**

**अध्ययन निष्पत्ती :- ५.०१.०१ ऐकलेल्या, वाचलेल्या साहित्यातील विषय,घटना, चित्रं, पात्रं, व शीर्षक यांबाबत चर्चा करतात.**
**६.०१.११ विभिन्न साहित्य प्रकारांत लिहिलेल्या लेखन साहित्याचे आरोह अवरोहासह व योग्य गतीने वाचन करतात.**
**६.०१.१८ पाठ्यविषय (पाठ, कविता, विनोद, गाणी इ. ) लक्षपूर्वक ऐकून त्यांचा आनंद घेतात.**

## जाणून घेऊ या

- **शिक्षकांनी खाली दिलेली नाटिका विद्यार्थ्यांना वाचनासाठी द्यावी. त्यांचे गट करून नाटिकेतील पात्रे वाटून द्यावी. तयारीसाठी १० मि.वेळ द्यावा. नाटकाचे सादरीकरण करून घ्यावे.**

अतुल : ए सुहास ! चल ना रे खेळायला.
सुहास : थांब ना रे जरा. ह्या पेपरमध्ये किती छान माहिती छापून आली आहे. ह्या माहितीचं कात्रण कापून घेतो. मग जाऊया ना खेळायला.
अतुल : तू एवढ्या कात्रणांचं करतोस तरी काय ?
सुहास : अरे, वर्तमानपत्रांत छान छान कविता, चित्रकथा, गोष्टी, कोडी, पशुपक्ष्यांची माहिती येते. ती मी कापून वहीत चिकटवतो. मॅडमनं सांगितलेला प्रकल्प पूर्ण होतो.
अतुल : अरे वा ! छानच.
सुहास : अरे एवढंच नाही. काही वेळा रद्दीमध्ये कवितांची, गोष्टींची चांगली पुस्तकं येतात. ती मी बाजूला काढून ठेवतो.
अतुल : त्या पुस्तकांचं तू काय करतोस ?
सुहास : त्यांचं मी एक वाचनालय तयार केलं आहे. चल माझ्या घरी. मी तुला दाखवतो.
(ते दोघे सुहासच्या घरी येतात. त्याचवेळी मीनाही तिथे येते.)
सुहास : ये मीना.

मीना : सुहास, ही पुस्तकं तुझ्या वाचनालयासाठी घे. ही सगळी पुस्तकं माझ्या वडिलांनी आणली होती. आम्ही ती पुस्तकं वाचली. ती रद्दीत देण्याऐवजी तुझ्या वाचनालयासाठी मी घेऊन आले.

अतुल : हे छान झालं. मी सुद्धा तुला चांगली पुस्तकं देईन.

सुहास : मीना, अतुल मी तुमचा आभारी आहे. हे वाचनालय केवळ माझं नाही, तर सगळ्यांसाठी आहे. थेंबे थेंबे तळे साचे, तसं एक-एक पुस्तक गोळा करून हे वाचनालय तयार झालं आहे; म्हणून मी ह्या वाचनालयाचं नाव ठेवलं-'आपलं वाचनालय.'

अतुल : छान आहे नाव !

सुहास : चला तर ! आता आपण सगळे रविवारी भेटूया. वाचूया. खेळूया. अभ्यासही करूया.

(सारेजण हसतात.)

**शिक्षकांनी वर्गातील सर्व मुलांना नाट्यीकरणात सहभागी होण्याची संधी द्यावी. नाट्यीकरणात विद्यार्थी कशा प्रकारे नाटिकेचे सादरीकरण करतात हे जाणून घ्यावे.**

## सक्षम बनू या

- शिक्षकांनी नाट्यीकरण या संबोधाविषयी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करावे.
- नाटकाचा विषय,पात्रे,त्यांचे संवाद, वेशभूषा, देहबोली, हावभाव व आवाजातील चढ उतारासह, स्पष्ट शब्दोच्चारासह नाटिकेचे वाचन, सादरीकरण, रंगमंच इ. नाटकाचे घटक समजावून सांगावेत.
- शिक्षकांनी इ.५ वी पाठ्यपुस्तकातील 'अति तिथं माती 'या नाटकाचे नाट्यवाचन करून दाखवावे.
- विद्यार्थ्यांना नाट्यवाचनासाठी वेळ द्यावा. नाटकातील पात्रे मुलांमध्ये वाटून द्यावीत.वर्गात नाटकाचे सादरीकरण करून घ्यावे.आवश्यक तेथे मार्गदर्शन करावे.
- शिक्षकांनी वेगवेगळी बालनाटके मुलांपुढे वाचून दाखवावी. मुलांना वर्गासमोर नाट्यवाचनाची संधी द्यावी.

## चला सराव करू या

- **शिक्षकांनी गटागटात अति तिथं माती या नाटकाची तयारी करण्यास सांगावी.**
- **वर्गात गटागटाचे सादरीकरण करून घ्यावे.**
- **ज्या गटाचे नाटकाचे सादरीकरण सर्वांत चांगले (दिलेल्या निकषानुसार) होईल त्यांचे कौतुक करावे.**
- **शिक्षकांनी बालनाटके वाचनास उपलब्ध करून द्यावीत.**

## • कल्पक होऊ या

- शिक्षकांनी बालनाटके वाचनास उपलब्ध करून द्यावीत.
- शिक्षकांनी विद्यार्थ्यांचे गट करावे. प्रत्येक गटाने  विषय ठरवून घ्यावा. मुलांनी गटात नाटिका लिहून काढावी. मुलांनी नाटकाची तयारी करावी. वर्गात नाटकाचे सादरीकरण करून घ्यावे.

## पूरक साहित्य स्रोत

बालनाटकांची पुस्तके, किशोर मासिके, गोष्टींची पुस्तके, पूरवणी वाचनाची पुस्तके, इ - बालनाटकाची पुस्तके इ.

चौतिसावा /
पस्तीसावा दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती
संबोध :- चित्रावर गोष्ट लेखन

**अध्ययन निष्पत्ती :**

१) भाषेतील बारकावे , नियम , इत्यादीचा विचार करून स्वताची भाषा तयार करतात आणि त्याचा आपल्या लेखनात समावेश करतात .

२) पाहिलेल्या, ऐकलेल्या गोष्टी / घटना मुद्दे याना स्वतःच्या भाषेत कथन करतात, लिहितात .

## जाणून घेऊ या

खाली चार चित्रे दिली आहेत त्याचा सहसंबंध लावून गोष्ट / कथा तयार करण्यास सांगतात.






शिक्षक कथा लेखनासाठी वर्गात चर्चा करतात .

चित्र कसली आहेत . आपण चित्राविषयी काय लिहू शकतो यावर चर्चा करून प्रथम त्याचे लेखन करून घेतात. त्यानंतर याच चित्राद्वारे सहसंबध जोडून मुलांना एखादा प्रसंग लिहिण्यास सांगतात.

## सक्षम बनू या

वरील चित्राचा सहसंबंध जोडून कथेचे लेखन करण्यास सांगतील .

चित्र कोणती आहेत . चित्राचा काही सहसंबंध जोडता येईल का ? चित्राविषयी माहिती सांगा ? अशा विविध प्रश्नाद्वारे कथालेखानासाठी विद्यार्थ्यांसोबत चर्चा करतील , कथा लिहून घेतील .

कथेचे वाचन घेतील .






## चला सराव करू या

चित्रातील प्रसंग पहा व गोष्ट लिही




## • कल्पक होऊ या

दिलेल्या चार शब्दांच्या आधारे गोष्ट लिही.

पाऊस डोंगर घर बैल

## पूरक साहित्य स्त्रोत

भाषा साहित्य पेटीतील चित्र , गोष्टीची पुस्तके , किशोर मासिक.

छत्तीसावा दिवस

क्षेत्र – वाचन

कौशल्ये / क्षमता :- समजून मूकवाचन करणे, त्यावर बोलणे, आकलनासह गतिवाचन

संबोध :- मूकवाचन

**अध्ययन निष्पत्ती:-**

**५.०१.०६ आपल्या पाठ्यपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य समजून घेऊन वाचन करतात, त्याविषयी बोलतात.**

**६.०१.२२ दिलेल्या वेळेत योग्य गतीने समजपूर्वक मूकवाचन करतात.**

**जाणून घेऊ या**

**● शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील उताऱ्याचे मूकवाचन करण्यास सांगावे. शिक्षकांनी घड्याळात एका मिनिटाचा वेळ लावावा. एका मिनिटात विद्यार्थ्यांनी वाचलेली शब्दसंख्या वहीत मांडण्यास सांगावी.**

काल सकाळी सहाच्या सुमारास मी बाबांबरोबर फिरायला गेलो होतो. पूर्वेकडून सूर्य वर येत होता. सूर्याची ती लालसर पिवळी किरणे किती वेगळी व छान दिसत होती! त्यांच्याकडे मी वारंवार पाहत होतो. सकाळचा तो गारवा किती छान वाटत होता. रस्त्यातल्या झाडांवर वेगवेगळे पक्षी बसलेले होते. त्यांचे वेगवेगळे आवाज कानांवर पडत होते. बाबा खूपच भरभर चालत होते. चालता चालता मी मात्र दमलो होतो. बाबांना मी थांबायला सांगितले. आम्ही एका ठिकाणी बसलो. बाबा सकाळच्या मोकळ्या व शुद्ध हवेविषयी मला सांगत होते. खरंच त्या शुद्ध व मोकळ्या हवेचा अनुभव मला येत होता. मला प्रसन्न व ताजेतवाने झाल्यासारखे वाटत होते. रोज सकाळी लवकर उठण्याचा आणि फिरायला जाण्याचा अनुभव तुम्हीपण घ्या. तुम्हांलाही छान वाटेल.

• शिक्षक विद्यार्थी कितपत गतीने वाचू शकता हे विद्यार्थ्यांनी वाचलेल्या शब्दसंख्येवरून जाणून घेतात.

• शिक्षक विद्यार्थ्यांना हे समजावून सांगतात की जो गतीने वाचतो तोच गतीने विचार करू शकतो.

• वेगाइतकेच मजकूर समजपूर्वक वाचणे हेही तितकेच महत्त्वाचे आहे हे विद्यार्थ्यांना समजावून  सांगावे.

## सक्षम बनू या :-

•शिक्षकांनी  उतारावाचनासाठी घड्याळात वेळ लावावी. विद्यार्थ्यांना खालील उतारा मनात वाचण्यास सांगावा.



सौरऊर्जा

राजू उन्हात गेला. त्याच्या एका हातात भिंग व दुसऱ्या हातात कागद होता. त्याने भिंग कागदावर अशा रीतीने धरले की, प्रकाशाचा एक गोल ठिपका कागदावर उमटला. थोड्या वेळाने त्या ठिपक्याशी कागद जळू लागला. आगपेटीतील काडी न पेटवताच राजूने कागद जाळण्याची जादू केली. सूर्याच्या किरणांत उष्णता असते. ती उष्णता साठवून एक शक्ती निर्माण करता येते. सूर्याच्या या शक्तीला सौरऊर्जा म्हणतात. सौरऊर्जेने दिवे पेटवता येतात. रेडिओ, टि.व्ही. चालवले जातात. सौरऊर्जेवर मोटारी चालवण्याचे प्रयोग केले जात आहेत. सौरऊर्जा हे फार महाग नसलेले इंधन आहे.

म/३१/०२

• शिक्षकांनी वरील उतारा वाचण्यासाठी विद्यार्थ्यांना लागलेला वेळ व शब्दसंख्या फळ्यावर मांडावी.
• उतारा झाकून टाकावा.
• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना वाचलेल्या उताऱ्यावर आधारित पाच प्रश्न फळ्यावर लिहून द्यावेत.

१) स्वस्त असणारे इंधन कोणते? २) राजूने केलेली जादू कोणती? ३) सौरऊर्जा कशास म्हणतात?
४) सौरऊर्जेचे उपयोग कोणते? ५) ऊन नसते तर भिंगांच्या मदतीने कागद जळेल का?
• विद्यार्थ्यांना वरील प्रश्नांची उत्तरे थोडक्यात लिहिण्यास सांगावी.
• शिक्षकांनी अचूक उत्तरे सांगावीत.विद्यार्थ्यांनी उत्तरे तपासावी.अचूक उत्तरांची संख्या वहीत मांडावी.
• कमी वेळात जास्तीत जास्त शब्द वाचलेल्या व सर्व उत्तरे अचूक असणार्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करावे.याप्रमाणे इतर मुलांनाही वाचनाची व आकलनासह केलेल्या परीक्षणाची माहिती द्यावी.
• शिक्षकांना आकलनासह गतिवाचनाचे महत्त्व समजून सांगावे.ज्यांना कमी वेळेत जास्त मजकूर आकलनासह वाचता येतो त्यांचे आकलनासह गतिवाचन चांगले!
• इ. ५ वी च्या स्तरावरील विद्यार्थ्यांनी एका मिनिटात ७० शब्द या गतीने समजपूर्वक मूकवाचन करणे अपेक्षित आहे.इ.६ वी च्या स्तरावर एका मिनिटात ८० शब्द या गतीने समजपूर्वक मूकवाचन करणे अपेक्षित आहे.

## चला सराव करू या

शिक्षकांनी विद्यार्थ्यांना गटात पाठ्यपुस्तके, गोष्टीच्या पुस्तके,किशोर मासिके इ.साहित्य देऊन आवडते उतारे निवडण्यास सांगावे. मूकवाचनासाठी त्याचा उपयोग करावा.शिक्षकांच्या मदतीने गटप्रमुखांनी वेळ लावून गटातील विद्यार्थ्यांची वाचनाची गती तपासावी. आकलनावर आधारित प्रश्न विचारावेत.

## • कल्पक होऊ या

● शिक्षकांनी भाषा पेटीतील उताऱ्यांचे कार्ड्स, गोष्टीची पुस्तके,किशोर मासिके, इतर बालसाहित्य, इ -बालसाहित्य घेऊन विद्यार्थ्यांना स्वत:चे आकलनासह गतीवाचन तपासण्यास सांगावे.

## पूरक साहित्य स्त्रोत

किशोर मासिके, भाषापेटीतील उतारे असलेले कार्ड्स, गोष्टींची पुस्तके, पूरकवाचन पुस्तके इ.

सदतीसावा,

अडतीसावा दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती
संबोध :- घटनेचे वर्णन करणे

**अध्ययन निष्पत्ती :**

१) विविध प्रकारचे साहित्य ( वर्तमानपत्रे , बालसाहित्य , पोस्टर इत्यादीमधील ) संवेदनशील मुद्द्यावर आपले मत / विचार व्यक्त करतात . उदा " कठीण समय येत " हा पाठ वाचून मुले म्हणतात , " आम्ही नेहमीच इतराना मदत करतो ".

२) पाहिलेल्या , ऐकलेल्या गोष्टी / घटना मुद्दे याना स्वतःच्या भाषेत कथन करतात , लिहितात .

**जाणून घेऊ या**

इयत्ता ५ वी च्या पान क्रमांक ३६ वरील माळीण गाव एक घटना या घटकाचे वाचन व निरीक्षण करून घेतील.
घटनेत आलेल्या शिर्षकाद्वारे घटनेचे लेखन करण्यास सांगतील.
वर्णन वाचून घेतील व आवश्यक तेथे मार्गदर्शन करतील.
घटना लिहिताना कोठे घडली , कधी घडली , कारणे कोणती , मदत कशी मिळाली , अडचणी कोणत्या आल्या या सर्व मुद्द्यांचा विचार करण्याबाबत मार्गदर्शन करतात.

**सक्षम बनू या**

" अवेळी पडणारा पाऊस" या घटनेवर बातमी किवा घटनेचे वर्णन करणारे लेखन करा.

**चला सराव करू या**

कोरोना या आजाराविषयी येणाऱ्या बातम्यांच्या शीर्षकांची कात्रणे जमा करण्यास सांगतील व घडत असलेल्या घटनेचे सविस्तर लेखन करून घेतील . केलेल्या घटना लेखनाचे वाचन घेतील .

## • कल्पक होऊ या



**वरील चित्राचे निरीक्षण करा , चित्र कसले आहे ?**

**नुकत्याच आलेल्या तोक्ते चक्रीवादळाच्या घटनेचे तुमच्या शब्दांत वर्णन करणारे लेखन करा.**

## पूरक साहित्य स्त्रोत

**भाषा साहित्य पेटीतील चित्र.**

एकोणचाळीसावा / चाळीसावा दिवस

**क्षेत्र – वाचन**
**कौशल्ये / क्षमता :- समजपूर्वक वाचन, परिच्छेद करणे, त्यास योग्य शीर्षक देणे.**
**संबोध :- समजपूर्वक वाचन**

**अध्ययन निष्पत्ती :- ५.०१.०५ आपल्या पाठ्यपुस्तकाच्या आधारे इतर साहित्य समजून घेऊन वाचतात, त्यांविषयी बोलतात.**
**६.०१.२६ दिलेल्या उताऱ्याचे समजपूर्वक वाचन करून त्याचे परिच्छेद करतात, तसेच त्यास योग्य शीर्षक देतात.**

## जाणून घेऊ या

- **शिक्षक विद्यार्थ्यांना खालील उतारे वाचण्यासाठी देतात. उताऱ्याचे समजून वाचन करण्यास सांगतात. नंतर त्या उताऱ्यास दिलेल्या पर्यायातील योग्य शीर्षक देण्यास सांगावे.**
- **विद्यार्थी समजून उतारा वाचतात का हे दिलेल्या बरोबर शीर्षकांवरून जाणून घ्यावे.**

भयाण, काळोख्या रात्रीला घाबरू नये. कारण ती रात्र सरल्यानंतरच उज्ज्वल, तेजोमय पूर्व दिशा उजळणार असते. दिवस सुरू होणार असतो. परंतु त्यासाठी रात्र सरण्याची वाट पाहावी लागते. त्याचप्रमाणे जीवनात अनेक संकटे येतात. त्या संकटांना पाहून आपण भांबावून न जाता धैर्याने संकटांना सामोरे जावे. संयमी वृत्ती ठेवावी. काही काळातच ती संकटे जाऊन आपल्याला सुख मिळणार असते. किंबहुना संकट हेच सुखाच्या आगमनाची सूचना आहे हे लक्षात ठेवावे.

१. रात्र थोडी सोंगे फार २. लवकर निजे लवकर उठे, त्यास ज्ञानसंपदा भेटे.
३. धीर धरी रे धीरापोटी असती मोठी फळे गोमटी.
४. रात्रीच्या गर्भात असे उद्याचा रम्य उष:काल.
५. दिवसानंतर रात्र व रात्रीनंतर दिवस हे चक्र चालूच आहे.

कितीही संकटे आली तरी त्या परिस्थितीत मनाची शांती ढळू देऊ नये. आपल्या मनाविरुद्ध कोणी वागल्यास, आपला अपमान केल्यास त्यांचा अपराध पोटात घालावा. त्याला क्षमा करावी. सर्वांशी आपुलकीने, प्रेमाने वागावे. त्यामुळे आपल्याला सुख लाभते. मन:शांती मिळते. मनोमन समाधान लाभते. असे आचरण म्हणजेच आपल्या अंत:करणात परमेश्वराचे वास्तव्य आहे असे समजावे.

१. शठास महाशठ २. दया, क्षमा, शांती तेथे देवाची वसती.
३. कुणी एका गालावर मारले तर दुसरा गाल पुढे करावा.
४. उपकाराची फेड अपकाराने. ५. तोंड दाबून बुक्क्यांचा मार.

सतत लाचारीचे, अपमानाचे जीवन जगणे म्हणजे ते जिवंतपणी मरणच असते. त्यामुळे माणसाचे अस्तित्वच उरत नाही. असे हे उपेक्षित जीवन जगण्यापेक्षा माणसाने ताठ मानेने जगावे. दुसऱ्यावरील संकट दूर करताना, देशावरील प्रेम व्यक्त करताना, जीवनमूल्यांची जोपासना करताना मरण आले तर त्यातच जीवनाची धन्यता असते. त्यात अमर कीर्ती असते. तेच खरे जीवन होय.

१. जगून मरण्यापेक्षा मरून जगण्यात मोठेपणा आहे. २. मरणात खरोखर जग जगते.
३. शेळी होऊन शंभर वर्षे जगण्यापेक्षा वाघ होऊन एक वर्ष जगावे.
४. रोज मरे त्याला कोण रडे. ५. मरावे परी कीर्तिरूपे उरावे

माणसाने आतापर्यंत विज्ञानात बरीच प्रगती केली. पुष्कळ, सखोल ज्ञान मिळविले. परंतु ह्या सर्व ज्ञानाचा उगम कशातून झाला? गरजेतूनच. माणसाला जेव्हा एखाद्या गोष्टीची उणीव भासते. तेव्हा तो त्यावर विचार करतो, काहीतरी मार्ग शोधतो आणि तो त्याला सापडतोही त्यालाच शोध म्हणतात. या शोधांमुळेच आजपर्यंतच्या ज्ञानात भर पडली.

१. शोधा म्हणजे सापडेल.
२. गरज ही शोधाची जननी आहे.
३. प्रयत्नांती परमेश्वर
४. वाळूचे कण रगडिता तेलही गळे
५. जुन्याचा बोध नव्याचा शोध

## सक्षम बनू या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील  उतारा समजपूर्वक , आकलनासह वाचण्यास सांगावा.

शुक्रवारची दुपार होती. बाळूला भूक लागली होती. तो थकला होता. चालता चालता तो एका बागेजवळ पोहोचला. बाग फळांनी बहरलेली होती. बागेच्या प्रवेशद्वारावर त्याने पाटी पाहिली. त्यावर लिहिले होते. 'ही बाग खाजगी मालकीची आहे. येथील फळे व भाज्या तोडण्यास मनाई आहे.' ही बाग दुसऱ्याच्या मालकीची संपत्ती आहे. त्यामुळे फळे तोडणे गैर आहे. असा क्षणभर विचार करून तो काही पावले पुढे गेला. थोड्या वेळात पपईने लगडलेल्या एका मोठ्या झाडाजवळ येऊन तो थांबला. त्याने भोवताली पाहिले. आजूबाजूला कोणीही नाही, अशी खात्री केली. त्याला राहवले नाही. त्याने एक मोठी पपई तोडली. आनंदाने पपई खात खात चालू लागला. आपण किती भाग्यवान आहोत. असे त्याला वाटले. दोन तीन दिवसांनी त्याचे वडील त्याच्यावर एकदम रागावले आणि म्हणाले, तुझ्या आजोबांनी तुला शेजारच्या बागेतून पपई चोरताना पाहिले. हे मला समजले आहे म्हणून मी तुला शिक्षा करणार आहे. चोरी करणे चुकीचे आहे.

● वरील उताऱ्यावर आधारित आकलनावर प्रश्न विचारावेत.

नमुना प्रश्न :- १) बागेच्या प्रवेशद्वारापाशी कोणती पाटी लावली होती? २) बाळूने कोणते फळ खाल्ले? ३) बागेत बाळू कोठे थांबला? ४) बाळूला भाग्यवान असल्यासारखे का वाटले? ५) बाळूचे वडील बाळूला का शिक्षा करणार होते?

● वरील प्रमाणे प्रश्न विचारून विद्यार्थ्यांनी उतारा समजपूर्वक वाचला की नाही ते तपासावे.

● विद्यार्थ्यांना वरील उताऱ्यास योग्य शीर्षक देण्यास सांगावे.

● विद्यार्थ्यांना उताऱ्यात  योग्य ठिकाणी परिच्छेद करण्यास सांगावे.

## चला सराव करू या

• शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील उतारे निवडून समजपूर्वक वाचनाचा नियमितपणे सराव घ्यावा.
• गटात/ वैयक्तिकरित्या वाचनाचा सराव घेता येईल.

## • कल्पक होऊ या

• शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील, पाठ्यपुस्तकेतर वाचन साहित्य विद्यार्थ्यांना वाचनास उपलब्ध करून द्यावे. वाचलेल्या उतार्यावर आधारित प्रश्न तयार करण्यास सांगावे. गटात एकमेकांना प्रश्न विचारावेत. उताऱ्यास योग्य शीर्षक द्यावे.

## पूरक साहित्य स्त्रोत

भाषा साहित्य पेटीतील उतारे असलेले कार्ड्स, गोष्टींची पुस्तके , किशोर मासिके, इतर बालसाहित्य, इ - पुस्तके, मुलांसाठीचे साप्ताहिक अंक, वर्तमानपत्रे इ.

एकेचाळीसावा दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती
संबोध :- कल्पना करून तुझ्या शब्दात लिही

अध्ययन निष्पत्ती :

१) आपल्या परिसरात घडणाऱ्या घटनाबाबत बारकाईने निरीक्षण करून त्यावर लिखित स्वरूपात प्रतिक्रिया व्यक्त करतात .
२) पाठ्यपुस्तक व इतर लेखन प्रकारातील संवेदनशील विषयावर लिखित स्वरूपात / ब्रेल लिपीमध्ये अभिव्यक्त होतात .
३) विविध प्रसंग व संदर्भांनुसार सांगितलेल्या गोष्टी अनुभव स्वत:च्या भाषेत लिहितात .

## जाणून घेऊ या





वरील चित्र पाहा . बैल पोळ्याचा सण संपल्यानंतर बैलाला काय वाटत असेल याविषयी कल्पना करून थोडक्यात लिहा.
शिक्षक लेखनासाठी मार्गदर्शन करतील, चित्रामध्ये काय फरक दिसत आहे यावर प्रश्न विचारतील .
त्यानुसार दिलेल्या विषयावर कल्पना करून केलेल्या लेखनाचे वाचन करून घेतील.

## सक्षम बनू या

पुस्तक तुमच्याशी बोलते अशी कल्पना करून ८ ते १० वाक्ये लिहा.
मुद्दे :
पुस्तकाचे उपयोग , त्याचा वापर कसा होतो व कसा करावा , कोणती काळजी घ्यावी , पुस्तक जपून का वापरावे ? पुस्तक आपले मित्र कसे आहे ? या मुद्द्यांच्या द्वारे चर्चा करून वरील विषयांवर लिहिण्यास सांगतात.

## चला सराव करू या




आगगाडी तुमच्याशी बोलत आहे अशी कल्पना करून ती तिची कहाणी तुम्हाला काय सांगेल ते त्याचे लेखन करून घेतील .

## • कल्पक होऊ या

प्लास्टिक पिशव्यांचा वापर बंद केल्याने आपल्याला कोणकोणते फायदे होतील याची कल्पना करा व लिहा.

## पूरक साहित्य स्त्रोत

भाषा साहित्य पेटीतील चित्र व इतर समांतर चित्र.

बेचाळीसावा
दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- अनुलेखन,श्रुतलेखन
संबोध :- लेखन

**अध्ययन निष्पत्ती:-** ५.०१.०८ स्वत:च्या इच्छेने किंवा शिक्षकांनी ठरवलेल्या कृतीअंतर्गत लेखनप्रक्रिया उत्तम तऱ्हेने समजून स्वत:चे लेखन पडताळतात.
६.०१.२४ परिच्छेदाचे अचूक अनुलेखन व श्रुतलेखन करतात.

## जाणून घेऊ या

•शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील उतारा पाहून सुवाच्य अक्षरांत वहीत लिहिण्यास सांगावे.



कोणतीही गोष्ट मिळवण्यासाठी दोन गोष्टींची आवश्यकता असते. एक म्हणजे ध्यास आणि दुसरी म्हणजे अभ्यास. शक्ती आणि युक्ती यांचा योग्य वापर केल्यास कोणत्याही कामातील अडचणी दूर होतात. इच्छित ध्येय साध्य झाल्याशिवाय प्रयत्न अर्धवट सोडून देणे म्हणजे माघार घेणे होय, म्हणून यश मिळवण्यासाठी प्रत्येकाच्या अंगी जिद्द, चिकाटी आणि आत्मविश्वास आवश्यक असतो.

• विद्यार्थ्यांनी उताऱ्यांचे अचूक लेखन केले आहे का हे वह्या तपासून जाणून घ्यावे.
• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना खालील शब्द ऐकून वहीत लिहिण्यास सांगावे.
* क्रिकेट *पर्यावरण *रॉकेट *दुष्काळ * स्वत:च्या
* चिल्लीपिल्ली * हद्द * उत्कृष्ट *स्वच्छता. * आमंत्रण
• विद्यार्थ्यांनी सर्व शब्द अचूकपणे लिहिलेले आहेत का ते तपासून घ्यावे.
• शिक्षकांनी वरील उताऱ्याचे श्रुतलेखन सांगावे. उतारा अचूक लिहिला आहे का ते तपासावे.

## सक्षम बनू या

• शिक्षकांनी अनुलेखन , श्रुतलेखन कसे करावे याचे मार्गदर्शन करावे.

*अनुलेखन - १) नीटनेटके लेखन - • सुवाच्य, वळणदार अक्षर • अक्षरांची उंची समान • स्वरचिन्हे, जोडाक्षरे यांचे अचूक आकार , स्थान • दोन अक्षरांतील अंतर समान • दोन शब्दांतील अंतर समान २)अचूक लेखन - • स्वरचिन्हांचा अचूक वापर • विरामचिन्हांचा अचूक वापर • शब्दांच्या अचूक रूपांचा वापर ३) लेखन गती -• दिलेल्या वेळेत लेखन करणे.

*श्रुतलेखन - १) सुवाच्य लेखन २) अचूक लेखन - • उच्चारात सूक्ष्मभेद असलेल्या अक्षरांचे अचूक लेखन.उदा.न - ण,श - ष,स - श • जोडाक्षरांचे अचूक लेखन • स्वरचिन्हांचे अचूक लेखन • विरामचिन्हांचे अचूक लेखन. ३) लेखन गती - •शब्द एकदा ऐकून लिहिणे. • पूर्ण वाक्य ऐकून लक्षात ठेवणे व लिहिणे.

• शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील एक उतारा अनुलेखनासाठी निवडावा. त्याचे विद्यार्थ्यांना अनुलेखन करण्यास सांगावे. मुलांचे अनुलेखन तपासावे. योग्य मार्गदर्शन करावे.

(योग्य आकार,उंची व अक्षरातील , शब्दांतील अंतर, सुवाच्य व खाडाखोड न करता , स्वरचिन्हे,जोडाक्षरे व विरामचिन्हे याबाबत काळजी घेऊन अनुलेखन करण्यास सांगावे.)

• शिक्षकांनी तोच उतारा श्रुतलेखनासाठी निवडावा. त्याचे श्रुतलेखन करून घ्यावे. श्रुतलेखन तपासावे व योग्य मार्गदर्शन करावे. (ऐकलेला मजकूर दुसऱ्यांना वाचता येईल असा लिहिता येणे, अक्षरांच्या उच्चारांतील सूक्ष्म भेद समजून विरामचिन्हांचा अचूक वापर करून श्रुतलेखन करण्यास सांगावे.)

## चला सराव करू या

• शिक्षकांनी पाठ्यपुस्तकातील उतारे अनुलेखनासाठी व श्रुतलेखनासाठी निवडावेत. दररोज अनुलेखनाचा सराव घ्यावा. विद्यार्थ्यांनी स्वयंमूल्यमापन करून आपले लेखन तपासावे किंवा गटनायकाची मदत घ्यावी. चुका असतील तर पुनर्लेखन करून घ्यावे.

• ज्या विद्यार्थ्यांच्या लेखनात चुका जास्त असतील व लेखन सुवाच्य नसेल त्या विद्यार्थ्यांकडून चुकलेल्या शब्दांचे अनुलेखन व नंतर श्रुतलेखन घ्यावे.

## • कल्पक होऊ या

• शिक्षकांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील, पाठ्यपुस्तकेतर साहित्यातील, गोष्टीतील , मासिकातील आवडलेला मजकूर पाहून त्यांचे अनुलेखन सुंदर, सुवाच्य अक्षरात वहीत करण्यास सांगावे.

• आवडलेल्या कवितेच्या ओळी, सुविचार यांचे सुंदर व सुवाच्य अक्षरात अनुलेखन करावे.

## पूरक साहित्य स्त्रोत

भाषा साहित्य पेटीतील शब्दकार्डस् (जोडाक्षरयुक्त), उतारे असलेले कार्ड्स, गोष्टींची पुस्तके , किशोर मासिके इ.

त्रेचाळीसावा दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती
संबोध :- उपक्रमाचे वर्णन

## अध्ययन निष्पत्ती :

१) आपल्या परिसरात घडणारे प्रसंग , घटना इत्यादीचे सूक्ष्म निरीक्षण करतात. त्यावर तोंडी प्रतिक्रिया , व्यक्त करतात , प्रश्न विचारतात.
२) इतरांनी सांगितलेले अनुभव आवश्यकतेनुसार लिहितात . उदा.सार्वजनिक ठिकाणी ऐकलेल्या गोष्टी घटना लिहिणे .

## जाणून घेऊ या

शिक्षक विद्यार्थ्यांना चित्र दाखवतील . चित्रावर प्रश्न विचारून चर्चा करतील .
तुमच्या शाळेत वृक्षारोपण हा उपक्रम कसा साजरा करतात त्याचे वर्णन करून घेतील .
लिहिलेल्या वर्णनाचे वाचन घेतात.
उपक्रमाचे वर्णन करताना येणाऱ्या महत्त्वाच्या खालील मुद्यांवर चर्चा करतात.
कोणता उपक्रम, कधी, कशासाठी, वर्षभर काळजी घेता का? उपक्रम ठरविताना कोण कशी मदत करते, उपक्रमाचा आपल्याला काय उपयोग .



## सक्षम बनू या

शाळेत साजरे होणारे विविध राष्ट्रीय सण ( प्रजासत्ताक दिन , स्वातंत्र्य दिन ) कसे साजरे केले जातात त्या उपक्रमाचे वर्णन करून घेतील .
राष्ट्रीय सणाच्या आयोजनात कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो, नियोजन कोण करते, ते कसे साजरे केले जातात यासाठी शिक्षक प्रश्न उत्तराद्वारे चर्चा घेतात व उपक्रमाचे वर्णन लिहून घेतात.

## चला सराव करू या

शाळेत साजऱ्या होणाऱ्या बालिका दिन या उपक्रमात कोणकोणत्या बाबींचा समावेश होतो , कोणकोणत्या स्पर्धांचे आयोजन केले जाते , बालिका दिन का साजरा केला जातो याविषयी शिक्षक माहिती वजा चर्चा घेतील. प्रश्न विचारतील व शाळेत साजऱ्या होणाऱ्या बालिका दिन ह्या उपक्रमाचे वर्णन करण्यास सांगतील.

## • कल्पक होऊ या

आपण गावात होळी कशी साजरी करतो व शाळेत होळी कशी साजरी करतो या दोनही ठिकाणी साजऱ्या होणाऱ्या होळींमध्ये फरक असतो का? असल्यास त्याचे वर्णन करा.

## पूरक साहित्य स्त्रोत

किशोर मासिक , गोष्टीची पुस्तके.

चव्वेचाळीसावा
दिवस

क्षेत्र – लेखन
कौशल्ये / क्षमता :- स्वअभिव्यक्ती
संबोध :- घोषवाक्यांचे लेखन करा.

## अध्ययन निष्पत्ती :

१) भाषेतील बारकावे , नियम , इत्यादीचा विचार करून स्वत:ची भाषा तयार करतात आणि त्याचा आपल्या लेखनात समावेश करतात .
२) वेगवेगळ्या प्रसंगी वेगवेगळ्या उद्देशानुसार लिहितात . शब्द , वाक्य , वाकप्रचार , म्हणी याचा योग्य वापर करतात .

## जाणून घेऊ या

शिक्षक घोषवाक्य म्हणजे काय? घोषवाक्यांचा वापर आपण कुठे करतो. तसेच कोणकोणती घोषवाक्य ऐकलेली आहेत या प्रश्नाद्वारे चर्चा करतात. घोषवाक्याचा नमुना चित्राद्वारे दाखवून त्याचे वाचन व लेखन करून घेतील .



## सक्षम बनू या

**खालील विषयावर घोषवाक्य तयार करून लिहा.**

**१) प्लास्टिक पिशव्या न वापरणे**

**२) वृक्षारोपण**

**वरील विषयांवर प्रश्नाद्वारे चर्चा करून विषयांचे महत्त्व समजावतील घोषवाक्य तयार करून घेतील .**

## चला सराव करू या

**खालील चित्रावर घोषवाक्य लिहून घेतील .**











## • कल्पक होऊ या

**शिक्षणाचे महत्त्व समजावून देणारी ५ घोषवाक्य तयार करून लिहा.**

## पूरक साहित्य स्त्रोत

**भाषा पेटीतील प्रसंग चित्र.**

**पंचेचाळीसावा दिवस**

**: राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद ,पुणे :**

**इयत्ता-६वी.**
**गुण-३०**

## सेतू अभ्यास चाचणी क्र.-३ ( दिवस एकतिसावा ते चव्वेचाळीसावा )

**विद्यार्थ्यांचे-------------------------------------------------------------------------------------------**

**प्रश्न:१.अ) खालील उतारा वाचून योग्य शीर्षक लिही. (गुण-१)**

आपण इतरांना चांगल्या वागणुकीचा उपदेश करावयाचा आणि आपणच त्या उपदेशाप्रमाणे वागत नसू तर त्या उपदेशाला काय अर्थ? त्यामुळे आपले बोलणे कोणीच लक्षात घेणार नाही. कृतिशून्य बोलण्यावर कोणीही विश्वास ठेवत नाही. म्हणून काही कृती न करता दुसऱ्यास उपदेश करू नये. आपल्या आचरणातून लोकांना त्या उपदेशाचे महत्त्व पटवून द्यावे. म्हणून दुसऱ्याला कोणतीही गोष्ट सांगण्यापूर्वी आपण स्वतः तसे वागले पाहिजे.

१. बोले तैसा चाले त्याची वंदावी पाऊले.
२. लोका सांगे ब्रह्मज्ञान, आपण कोरडे पाषाण.
३. करावे तसे भरावे.
४. क्रियेविण वाचाळता व्यर्थ आहे.
५. विचार करून बोला, बोलून विचार करू नका.

**ब ) 'काहीही न करणे' यासाठी उताऱ्यात कोणता शब्द आला आहे ते लिही. (गुण-१)**

**क) वरील उताऱ्यावर दोन प्रश्न तयार कर व लिही. (गुण-२ )**

**प्रश्न:२.कोरोना -१९ पासून सुरक्षित राहण्यासाठी दोन घोषवाक्य लिही. (गुण-२)**

**प्रश्न:३.चित्रावरून गोष्ट तयार कर. (गुण-३)**



**प्रश्न:४. खालील आद्याक्षरापासून नाम,विशेषण व क्रियापद बनव.** **(गुण-३)**

**प -**

**प्रश्न:५. खालील वाक्याचा काळ ओळख. उरलेल्या दोन काळात वाक्याचे रूपांतर करून लिही.** **(गुण-२)**

बाग सुंदर आहे.

**प्रश्न:६.खालील जाहिरात वाचून त्या आधारित प्रश्नांचीउत्तरे लिही.** **(गुण-५)**




१) ही जाहिरात कशा संदर्भात आहे?

२) कोणत्या कालावधीमध्ये पुस्तक प्रदर्शन भरविण्यात येणार आहे?

३) प्रदर्शन कोठे भरणार आहे ?

४) शंभर रुपयांच्या खरेदीवर किती रुपयांची सवलत मिळणार आहे ?

५) पुस्तक प्रदर्शनात तुम्ही कोणत्या प्रकारची पुस्तके खरेदी कराल ते सांगा.

**प्रश्न:७. खालील मजकूर वाच व विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही.** **(गुण-३)**

आमची गाय खूप दूध देते. आई दूध तापवून साय काढते. सायीपासून लोणी आणि मग लोण्याचे तूप बनवते. थोडे तूप काकीला देते. थोडे तूप मामीला देते. तरीही घरी खूप तूप असते. आई मला तूप - भात खायला देते. मला तू खूप आवडते.

अ) आई तूप कोणा - कोणाला देते?

ब) दुधापासून लोणी कसे बनते?

क) मजकुरात हे - चिन्ह आले आहे का. त्याचे नाव लिही.

**प्रश्न:८.खाली दिलेल्या शब्दांपासून गोष्ट बनव. (गुण-४)**

कावळा, पिशवी, चप्पल, गुलाब .

**प्रश्न:९. खालील पत्राचे वाचन कर व त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिही . (गुण-४)**

दि. १५/०६/२०२१

प्रिय बाई,

टीव्हीवर परत यावर्षी कोरोना -19 मुळे शाळा ऑनलाईन सुरू होणार आहे ही बातमी पाहिली आणि गेल्या वर्षीचा जून महिना डोळ्यासमोर तरळू लागला. बाई गेल्या जून मध्ये कोरोनामुळे शाळा सुरू होणार नाही हे ऐकून खरं तर खूप आनंद झाला. खरं खरं सांगते बाई हा आनंद क्षणभंगुर होता. थोड्याच दिवसात या सुट्ट्या आपल्यापासून काही हिरावून घेत आहेत याची जाणीव होऊ लागली.कुठेतरी नवीन शिकण्यापासून शाळेतील गमतीजमती, नवीन मित्र-मैत्रिणी आणि भन्नाट खेळांपासून आम्ही पोरके होत आहोत का? असे वाटायला लागलेय.

शाळेतला प्रत्येक तास, तुमचे शिकवणे हे आठवू लागलेय. बाई एक विनंती आहे! तुमच्या मोठ्या साहेबांना सांगा आणि माझी शाळा पुन्हा सुरू करा.

तुमची,

सायली

माझा पत्ता:
सायली कदम
मु.पो.अंबेजोगाई
ता.अंबेजोगाई
जि. बीड.
पिन - ४३१५१७.

अ) पत्र लिहिणाऱ्या मुलीचे नाव तू कशावरून ओळखलेस ते लिही.

ब) 'काही काळापुरतेच' यासाठी पत्रात कोणता शब्द आला आहे ते लिही.

क) पत्रात सायलीने कोणत्या वर्षातील जून महिन्याचा उल्लेख केला आहे ?

ड) पत्रातील सायलीच्या पत्याप्रमाणे तुझा पत्ता तयार कर व लिही.